दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २९२ I बुधवार ५ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## ‘पत्नीची क्रूरता’ सिद्ध न झाल्याने पतीचा घटस्फोटाचा दावा फेटाळला



**अहिल्यानगर :** येथील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांनी हिंदू विवाह याचिकेमध्ये दि. २८ जुलै २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय देत भारतीय सैन्य दलातील पतीने पत्नीविरुद्ध दाखल केलेली घटस्फोटाची याचिका खर्चासह फेटाळून लावली. या प्रकरणात अर्जदार पतीने पत्नीने विविध प्रकारे क्रूरता केल्याचा आरोप करत घटस्फोटाची मागणी केली होती. न्यायालयाने दोन्ही पक्षांचे साक्षी-पुरावे तसेच उपलब्ध कागदपत्रांचे सखोल परीक्षण करून अर्जदाराने केलेले क्रूरतेचे आरोप विश्वासार्ह, ठोस व कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य पुराव्यांच्या आधारे सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे नमूद केले. केवळ आरोपांच्या आधारे विवाह विच्छेद मंजूर करता येणार नाही, असा स्पष्ट निष्कर्ष नोंदवत न्यायालयाने पतीची घटस्फोटाची याचिका फेटाळून लावली. तसेच, पत्नी व दोन अल्पवयीन मुलांच्या निर्वाहासाठी दरमहा २५ हजार रुपये इतकी रक्कम कायमस्वरूपी पोटगी अदा करण्याचे आदेश दिले आहेत.

## महत्त्वाचे..

### महिलेने ९ महिन्यांच्या बाळाच्या तोंडात फेविक्विक टाकले

**पुणे :** पुण्यातील लोहगाव परिसरातून मानवतेला काळिमा फासणारी आणि अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. कौटुंबिक वादाचा राग मनात धरून एका महिलेने अवघ्या ९ महिन्यांच्या निष्पाप बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतल्याचा अमानुष प्रकार घडला आहे.

ही भयानक घटना ३१ जुलै रोजी पुण्यातील लोहगाव परिसरातील कलवड वस्ती भागात घडली असून, याप्रकरणी अल्ताफ नबी शेख यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अल्ताफ शेख यांची पत्नी जैनाब आणि तिची भावजय आरोपी सानिया शेख यांच्यात काही कौटुंबिक कारणांवरून सतत वाद सुरू होते. हाच वादाचा राग मनात धरून आरोपी सानिया शेख हिने घरात शांत झोपलेल्या अवघ्या ९ महिन्यांच्या निष्पाप बाळाच्या तोंडात फेविक्विक ओतल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सुदैवाने वेळेत उपचार मिळाल्याने बाळाचे प्राण वाचले.

## मोबाईलच्या एका क्लिकवर....

# बाल लैंगिक शोषणाचा काळाबाजार!

- छत्रपती संभाजीनगरात सलग कारवाया; विद्यार्थ्यांसह तरुण अटकेत, हजारो आक्षेपार्ह व्हिडिओंचा तपास
- इंटरनेटच्या अति गैरवापराने समाजासमोर भीषण संकट; झटपट पैशांच्या हव्यासापोटी तरुणाई गुन्हेगारीच्या विळख्यात

**चिंतेची आकडेवारी**

- दोन स्वतंत्र कारवायांत विद्यार्थी आणि तरुण अटकेत
- ३,०४१ संशयित व्हिडिओंचा तपास
- २०० हून अधिक व्हिडिओ पोलिसांच्या हाती
- दुसऱ्या आरोपीकडून ४९० हून अधिक क्लिप्स जप्त
- टेलिग्रामद्वारे ऑनलाइन विक्रीचा संशय
- आयटी ॲक्ट कलम ६७-बी आणि पोक्सो अंतर्गत गुन्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**छत्रपती संभाजीनगर :** इंटरनेट आणि सोशल मीडियाचा बेफाम गैरवापर आता थेट बालकांच्या सुरक्षिततेलाच धोका निर्माण करू लागल्याचे धक्कादायक वास्तव छत्रपती संभाजीनगरातील सलग सायबर कारवायांतून समोर आले आहे. टेलिग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून बाल लैंगिक शोषणाशी संबंधित आक्षेपार्ह साहित्याची विक्री, देवाणघेवाण आणि साठवण करणाऱ्या रॅकेटवर सायबर पोलिसांनी मोठी कारवाई केली असून, बी.कॉम.चे दोन विद्यार्थी आणि स्वतंत्र कारवाईत अक्षय प्रकाश गायकवाड (वय २८) याला अटक करण्यात आली आहे.




सायबर पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, आरोपी गेल्या दीड वर्षांपासून टेलिग्रामवरील विविध गटांमधून बाल लैंगिक शोषणाशी संबंधित साहित्य विकत होते. एका छायाचित्रासाठी पाच रुपये, तर एका व्हिडिओसाठी १०० ते ४९९ रुपये आकारले जात होते. व्यवहार थेट बँक खात्यांद्वारे होत असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.

पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी क्लाऊडवरील डिजिटल पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, तांत्रिक तपासात तब्बल ३,०४१ संशयित व्हिडिओंचे धागेदोरे समोर आले असून, त्यापैकी सुमारे २०० व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागले आहेत. उर्वरित डेटा फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने पुनर्प्राप्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.दुसऱ्या कारवाईत अक्षय प्रकाश गायकवाड याच्या मोबाईलमधील पासवर्ड-संरक्षित फोल्डरमध्ये ४९० **(पान ४ वर)**

## ‘गुंगी गुडिया’वरून काँग्रेस-राष्ट्रवादी आमनेसामने

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई/बीड :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत काँग्रेसच्या अधिकृत सोशल मीडिया हँडलवरून करण्यात आलेल्या 'गुंगी गुडिया' या उल्लेखामुळे राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. काँग्रेसच्या या टीकेचा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), महायुतीतील नेते तसेच सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदविला असून, काँग्रेसने तत्काळ माफी मागावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



वादाची सुरुवात बीड दौऱ्यातील एका व्हायरल व्हिडिओवरून झाली. या व्हिडिओमध्ये आमदार धनंजय मुंडे बोलत असताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार शांत बसलेल्या दिसत असल्याचा संदर्भ देत काँग्रेसने, सुनेत्रा पवार अजून किती दिवस 'गुंगी गुडिया' बनून राहणार? असा सवाल उपस्थित केला. यानंतर राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सूरज चव्हाण यांनी काँग्रेसवर जोरदार पलटवार करत, काँग्रेस लोकांपासून दूर गेल्यामुळे अशा प्रकारची भाषा वापरत आहे. विरोधकांनी इंदिरा गांधींवरही अशाच प्रकारची टीका केली होती. सुनेत्रा पवार नियमितपणे पत्रकारांशी संवाद साधतात. काँग्रेसने जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असा आरोप केला. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही काँग्रेसवर निशाणा साधत, अशा प्रकारची भाषा वापरताना मनाची नाही तर जनाची तरी लाज बाळगली पाहिजे. महिलांविषयी अशा शब्दांचा वापर अशोभनीय आहे, असे स्पष्ट केले.सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध **(पान ४ वर)**

## विसापूर कारागृहातून पळालेल्या कैद्याला अखेर बेड्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** विसापूर खुले कारागृहातून शेतीच्या कामावरून परतत असताना पोलिसांची नजर चुकवून पलायन केलेल्या एका कैद्याला शोधून काढण्यात अखेर बेलवंडी पोलिसांना यश आले आहे. या कारवाईमुळे बेलवंडी पोलिसांच्या सतर्कतेचे कौतुक होत आहे . आरोपीविरुद्ध बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दि. २८ जुलै २०२६ रोजी विसापूर खुले कारागृहातील पोलीस शिपाई नितीन नवनाथ रनदिवे हे ११ कैद्यांना शेतीच्या कामासाठी बगीचा क्रमांक ०३ येथे घेऊन गेले होते. दिवसभर शेतीचे काम पूर्ण झाल्यानंतर दुपारी सुमारे ३.४० वाजण्याच्या सुमारास सर्व कैद्यांना पुन्हा कारागृहात परत आणण्यात येत होते. दरम्यान, पिंपळगाव पिसा-विसापूर मार्गावरील विसापूर धरणाच्या कालव्याजवळ आल्यानंतर सिद्धदोष कैदी शिवाजी लक्ष्मण जाधव (रा. मळोली, ता. माळशिरस, जि. सोलापूर) याने पोलिसांची व इतर कैद्यांची नजर चुकवत तेथून पलायन केले. ही बाब लक्षात येताच पोलिसांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली.



या प्रकरणी पोलीस शिपाई नितीन नवनाथ रानदिवे यांच्या फिर्यादीवरून बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.गुन्हा दाखल होताच बेलवंडी पोलिसांनी विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून पलायन केलेल्या कैद्याचा माग काढला आणि त्याला ताब्यात घेतले. त्यामुळे पुढील कोणताही अनुचित प्रकार घडण्यापूर्वीच आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले.सदरची कारवाई सहा. पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हे.कॉ. भाऊसाहेब यमगर पो.कॉ. दादासाहेब शिरसागर व विनोद पवार यांच्या पथकाने केली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार संदीप गवारे करीत आहेत.

## माजी राज्यपाल, शिक्षणमहर्षी डी.वाय. पाटील यांचे निधन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हापूर :** देशातील महत्त्वाच्या शिक्षणसंस्थांचे प्रणेते, माजी राज्यपाल आणि पद्मश्री पुरस्कार विजेते ज्ञानदेव यशवंतराव पाटील अर्थात डी. वाय. पाटील यांचे कोल्हापूरमध्ये निधन झाले आहे. त्यांनी वयाच्या ९० व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. २२ ऑक्टोबर १९३५ रोजी त्यांचा जन्म झाला होता. त्यांनी महाराष्ट्रात शिक्षणमहर्षी या उपाधीने ओळखले जात होते. त्यांनी शिक्षण, आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रात मोठे साम्राज्य उभारले होते. डी. वाय. पाटील यांनी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली होती. मात्र, काही काळानंतर त्यांनी सक्रिय राजकारणापासून बाजूला होत आपले पूर्ण लक्ष शिक्षण क्षेत्रावर केंद्रित केले होते.



डॉ. डी. वाय. पाटील यांचा परिवार शिक्षण, आरोग्य, उद्योग आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय आहे. त्यांच्या कुटुंबात अनेक सदस्य विविध शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापनाशी संबंधित आहेत. **(पान ४ वर)**

## श्रीरामपूरात ३ वर्षीय चिमुरडीचा मृत्यू

### अपघातानंतर उपचारांबाबत नातेवाईकांचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरातील बाजारतळ परिसरात मंगळवारी घडलेल्या हृदयद्रावक घटनेत अवघ्या तीन वर्षीय चिमुरडीचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे. सृष्टी गोरख धोत्रे (वय ३) असे मृत चिमुरडीचे नाव असून, तिच्या निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ट्रक चालकाला अटक केली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांनी दिली.



मिळालेल्या माहितीनुसार, सृष्टी सकाळी घराशेजारी खेळत असताना तेथील एक ट्रक चालक हसन कुरेशी (वय २२ वार्ड नं. २) गाडी मागे-पुढे घेत असताना ती गंभीर जखमी झाली. अपघातानंतर तिला तातडीने शहरातील एका बालरोग तज्ज्ञांकडे उपचारासाठी नेण्यात आले. प्राथमिक तपासणीनंतर उपचार करून तिला घरी सोडण्यात आल्याची माहिती असून, सिटीस्कॅन करण्याचा सल्लाही देण्यात आला होता. त्यानुसार सिटीस्कॅन करण्यात आला.

मात्र, दुपारनंतर सृष्टीची प्रकृती अचानक बिघडू लागल्याने तिला पुन्हा सायंकाळी रुग्णालयात नेण्यात आले. परंतु, उपचार सुरू होण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेनंतर रुग्णालयात एकच आक्रोश उसळला.

संतप्त नातेवाईकांनी डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच सृष्टीचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप करत निषेध व्यक्त केला. या घटनेमुळे बाजारतळ परिसरात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, रुग्णालय परिसरात काही काळ तणावाची स्थिती निर्माण झाली होती.

दरम्यान, या प्रकरणात पोलिसांनी अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनाच्या चालकाला ताब्यात घेतले असून, संबंधित वाहनही जप्त करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. पोलिसांकडून घटनेचा अधिक तपास सुरू असून, वैद्यकीय उपचारांबाबत करण्यात आलेल्या आरोपांचीही चौकशी होण्याची शक्यता आहे.

## राहुरी-शनिशिंगणापूर रेल्वे प्रकल्पाला हायकोर्टाचा ब्रेक!

### केंद्र-राज्य सरकारला खंडपीठाची नोटीस; शेतकऱ्यांच्या रिट याचिकेची दखल

### आठवडाभरात भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** बहुचर्चित राहुरी-शनिशिंगणापूर प्रस्तावित रेल्वे प्रकल्पाला महत्त्वाचे न्यायालयीन वळण मिळाले असून,या प्रकल्पाविरोधात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने केंद्र व राज्य सरकारला नोटीस बजावत एक आठवड्यात भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

त्यामुळे या प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेबाबत उत्सुकता निर्माण झाली आहेत.

प्रस्तावित रेल्वे मार्गामुळे शेतीचे मोठे नुकसान होणार असल्याचा दावा करत स्थानिक शेतकऱ्यांनी ॲड. गणेश प्रभाकर दरंदले यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली आहे.या याचिकेत प्रस्तावित रेल्वे मार्ग रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहेत.

(दि.३) ऑगस्ट २०२६ रोजी मा. न्या. सूर्यवंशी व मा. न्या. शिंदे यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. अमोल



एन. काकडे यांनी प्रभावी बाजू मांडली. प्रस्तावित रेल्वे मार्गाची आवश्यकता नसल्याचा दावा करत हा मार्ग स्थानिक शेतकऱ्यांच्या हितावर प्रतिकूल परिणाम करणार असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले दोन्ही बाजूंचा प्राथमिक युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने केंद्र व राज्य सरकारला नोटीस बजावत आपली भूमिका सादर करण्यासाठी एक आठवड्याची मुदत दिली.

- **तसेच प्रकरण पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे. या आदेशामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना तात्पुरता दिलासा मिळाल्याचे मानले जात असून, आता शासनाला न्यायालयासमोर प्रकल्पाची गरज, सार्वजनिक हित आणि रेल्वे मार्गाच्या निवडीमागील कारणे स्पष्ट करावी लागणार आहेत. या प्रकरणात ॲड. गणेश प्रभाकर दरंदले व ॲड. अमोल एन. काकडे यांनी कामकाज पाहिले, तर ॲड.अनंत अमोल काकडे यांनी त्यांना सहकार्य केले.**



# 'गुंगी गुडिया'चा राजकीय पुनर्जन्म




महाराष्ट्राचे राजकारण वैचारिक संघर्षासाठी ओळखले जात होते. यशवंतराव चव्हाण, बाळासाहेब ठाकरे, शरद पवार, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख यांच्यात विचारांचा संघर्ष झाला, आरोप-प्रत्यारोप झाले, पण सार्वजनिक भाषेच्या काही मर्यादा बहुतांशी पाळल्या गेल्या. आज मात्र राजकीय संवादाचा स्तर दिवसेंदिवस खालावत चालला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत वापरण्यात आलेल्या ''गुंगी गुडिया'' या शब्दप्रयोगामुळे पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या राजकारणात भाषेचा आणि संस्कृतीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

राजकारणात विरोधकांवर टीका करणे हा लोकशाहीचा आत्मा आहे; मात्र व्यक्तिमत्त्वावर, विशेषतः एखाद्या महिला नेत्याच्या अस्तित्वावर भाष्य करणारे शब्द वापरले जातात, तेव्हा ती केवळ राजकीय टीका राहत नाही. ती राजकीय संस्कृतीच्या अधःपतनाची नांदी ठरते. म्हणूनच या प्रकरणावर राज्यभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना यांनी या शब्दप्रयोगाचा निषेध केला, तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या शब्दप्रयोगाचे समर्थन केल्याने वाद अधिकच तीव्र झाला.

मात्र या वादाकडे केवळ आजच्या राजकारणाच्या चष्म्यातून पाहून चालणार नाही. ''गुंगी गुडिया'' या शब्दाचा इतिहास समजून घेतला, तर त्यामागील राजकीय संदर्भही स्पष्ट होतो. १९६६ मध्ये लालबहादूर शास्त्री यांच्या निधनानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. त्या काळात काँग्रेसमधील तथाकथित 'सिंडिकेट' नेत्यांना वाटत होते की इंदिरा गांधी त्यांच्या नियंत्रणाखाली राहतील. त्याच काळात समाजवादी नेते डॉ. राम मनोहर लोहिया यांनी त्यांच्या अल्पभाषी आणि मितभाषी शैलीवर टीका करत ''गुंगी गुडिया'' हा शब्दप्रयोग केला. तो त्यांच्या वैयक्तिक क्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारा राजकीय टोमणा होता.

परंतु इतिहासाने वेगळेच चित्र दाखवले. १९६९ मध्ये काँग्रेसची फूट, बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करण्याचा निर्णय आणि १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धातील विजय यानंतर इंदिरा गांधी याच 'गुंगी गुडिया'पासून जगाच्या नकाशावर ठाम नेतृत्वाचे प्रतीक ठरल्या. विरोधकांचा उपहास त्यांनी राजकीय सामर्थ्यात रूपांतरित केला. त्यामुळे ''गुंगी गुडिया'' हा शब्द केवळ उपहासाचा नाही, तर भारतीय राजकारणातील एका ऐतिहासिक प्रवासाचाही साक्षीदार आहे.

याच ऐतिहासिक संदर्भाचा आधार घेत काँग्रेसने किंवा तिच्या नेत्यांनी हा शब्द वापरला, असे स्पष्टीकरण दिले जात आहे. मात्र इतिहासातील एखादा शब्द आजच्या राजकीय वास्तवात जसाच्या तसा वापरणे योग्य ठरतेच असे नाही. काळ बदलतो, समाजाची संवेदनशीलता बदलते आणि सार्वजनिक संवादाच्या अपेक्षाही बदलतात. आज महिलांच्या सन्मानाबाबत समाज अधिक जागरूक आहे. त्यामुळे अशा शब्दांचा वापर सहजपणे दुर्लक्षित करता येत नाही.

दुसरीकडे, या वादावर प्रतिक्रिया देताना काही सत्ताधारी नेत्यांनीही अत्यंत आक्रमक भाषा वापरली. ''महाराष्ट्रात फिरू देणार नाही'', ''तोंड काळे करू'' अशा इशाऱ्यांनी राजकीय मतभेदांना लोकशाहीच्या चौकटीबाहेर नेण्याचा धोका निर्माण होतो. एका चुकीच्या वक्तव्याला उत्तर म्हणून दुसरी चिथावणीखोर भाषा वापरली, तर त्यातून लोकशाही नव्हे तर वैरभावाची संस्कृती वाढीस लागते. त्यामुळे अशा प्रतिक्रियाही तितक्याच चिंताजनक आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वादावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीचा स्तर घसरत असल्याचे म्हटले. त्यांचे निरीक्षण विचार करण्यासारखे आहे. कारण गेल्या काही वर्षांत राजकीय भाषेत सभ्यता कमी आणि वैयक्तिक अवमान अधिक दिसू लागला आहे. समाजमाध्यमांच्या युगात लक्ष वेधून घेण्यासाठी धक्कादायक विधान करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. त्यामुळे विचारांपेक्षा वाद, धोरणांपेक्षा व्यक्ती आणि विकासापेक्षा शब्दांची धुमश्चक्री अधिक चर्चेत राहते.

खरा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्राच्या जनतेला अशा राजकारणातून नेमके काय मिळते? शेतकरी, बेरोजगारी, महागाई, उद्योग, शिक्षण, आरोग्य, पाणी, गुंतवणूक, ग्रामीण विकास, महिला सुरक्षा अशा मूलभूत प्रश्नांवर सखोल चर्चा होण्याऐवजी राजकारण शब्दांच्या युद्धात अडकत चालले आहे. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना कठोर प्रश्न विचारावेत, सत्ताधाऱ्यांनी त्यांची उत्तरे द्यावीत, हे लोकशाहीचे सौंदर्य आहे. परंतु व्यक्तीगत अवमान आणि त्यावरून निर्माण होणारा गदारोळ हा लोकशाहीचा विजय नसून पराभव आहे.

इतिहास सांगतो की उपहासातूनही मोठे नेतृत्व घडू शकते. इंदिरा गांधी यांना ''गुंगी गुडिया'' म्हटले गेले, पण त्यांनी आपल्या कृतीतून उत्तर दिले. त्यामुळे कोणत्याही नेत्याला किंवा नेत्योला कमी लेखणारे विशेषण वापरण्यापेक्षा त्यांच्या कामगिरीवर, निर्णयांवर आणि भूमिकांवर कठोर टीका करणे हेच अधिक प्रभावी आणि लोकशाहीस साजेसे ठरते.

महाराष्ट्राने देशाला सुसंस्कृत राजकारणाची परंपरा दिली आहे. ही परंपरा टिकवण्याची जबाबदारी सत्ताधारी आणि विरोधक दोघांचीही आहे. कारण शब्द हे केवळ वाद निर्माण करत नाहीत; ते समाजाचा राजकीय स्वभाव घडवतात. आज ''गुंगी गुडिया'' या एका शब्दाभोवती निर्माण झालेला वाद उद्या विसरला जाईल; पण सार्वजनिक जीवनातील भाषेचा दर्जा सतत घसरत राहिला, तर लोकशाहीतील संवादच कायमचा जखमी होईल. म्हणूनच आता राजकीय पक्षांनी क्षणिक प्रसिद्धीपेक्षा दीर्घकालीन राजकीय संस्कृतीला प्राधान्य देण्याची वेळ आली आहे.

## आ. काळे यांच्या वाढदिवसानिमित्त गौतम पब्लिक स्कूलमध्ये भव्य क्रीडा महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्याचे कार्यकुशल आमदार आशुतोष काळे यांच्या वाढदिवसानिमित्त गौतम पब्लिक स्कूल, गौतमनगर येथे भव्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या सचिव मा.सौ.चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या तीन वर्षांपासून हा क्रीडा महोत्सव सातत्याने आयोजित केला जात असून, इतर शाळेतील विद्यार्थ्यांना गौतम पब्लिक स्कूलच्या प्रशस्त क्रीडांगणाचा लाभ घेता यावा व त्यांच्या क्रीडा कौशल्याला वाव मिळावा हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.



या क्रीडा महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या क्रिकेट, हॉकी, फुटबॉल व व्हॉलीबॉल या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. सहभागी विद्यार्थ्यांना संस्थेच्या सचिव सौ.चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत नाशिक, निफाड, छत्रपती संभाजीनगर, कोपरगाव, मालेगाव,राहाता, श्रीरामपूर आदी शाळेतील विविध शाळांचे खेळाडू मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटनासाठी कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटीचे निरीक्षक नारायणराव बारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते स्पर्धांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्यांनी खेळाचे जीवनातील महत्त्व अधोरेखित केले. नियमित खेळ, पौष्टिक व संतुलित आहार यामुळे शारीरिक आरोग्य सुदृढ राहते तसेच मानसिक संतुलन व आत्मविश्वास वाढण्यास मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शाळेच्या विविध क्रीडांगणांवर हॉकी, फुटबॉल, क्रिकेट व व्हॉलीबॉलचे सामने अतिशय रंगतदार झाले. हे सामने पाहण्यासाठी विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. सर्व स्पर्धा खेळीमेळीच्या वातावरणात व उत्साहपूर्ण पद्धतीने संपन्न झाल्या. या स्पर्धेत हॉकी विजेता गौतम पब्लिक स्कूल, उप विजेता बीपी पाटील ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स निफाड, फुटबॉल- विजेता गौतम पब्लिक स्कूल, उपविजेता समता इंटरनॅशनल स्कूल, कोपरगाव व्हॉलीबॉल मुली विजेता गौतम पब्लिक स्कूल,उपविजेता राधाबाई काळे कन्या विद्या मंदिर कोळपेवाडी, क्रिकेट विजेता गौतम पब्लिक स्कूल, उप विजेता साई क्रिकेट अकॅडमी श्रीरामपूर या संघांनी बाजी मारली.स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या संघांना शाळेचे प्राचार्य नूर शेख यांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विषयाच्या शिक्षिका सौ.सुरेखा जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन क्रीडा विभाग प्रमुख रमेश पटारे यांनी केले.हा क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी प्राचार्य नूर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा संचालक रमेश पठारे, इसाक सय्यद, राजेंद्र आढाव, महेश गोंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सर्व हाऊस मास्टर्स, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## जोगेश्वरी सोसायटीच्या स्वीकृत संचालक पदी आनंद गुंजाळ बिनविरोध

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** जोगेश्वरी आखाडा विविध कार्यकारी सहकारी विकास सोसायटीच्या स्वीकृत संचालकपदी आनंद भारतराव गुंजाळ यांची बिनविरोध निवड होत, सहकार क्षेत्रासोबतच स्थानिक राजकारणातही नवे समीकरण तयार होण्याचे संकेत मिळत आहेत. संचालक मंडळाच्या बैठकीत एकमताने झालेल्या या निर्णयामुळे गुंजाळ यांचे संघटनात्मक व सामाजिक वर्चस्व अधिक मजबूत झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

सोसायटीचे ज्येष्ठ मार्गदर्शक ज्ञानदेव केशवराव हारदे, माजी संचालक विजयकुमार डौले, माजी चेअरमन मारुतराव हारदे तसेच नानासाहेब भुजाडी यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड पार पडली. या निर्णयातून सोसायटीतील एकजूट आणि नेतृत्वावरील विश्वास अधोरेखित झाल्याचे बोलले जात आहे.

बैठकीस संस्थेचे चेअरमन प्रकाश नानासाहेब भुजाडी, व्हाईस चेअरमन प्रदीप भुजाडी यांच्यासह नगरसेवक व संस्थेचे संचालक प्रशांत डॉले, डॉ. रखमाजी घाडगे, राजेंद्र काळे, संदीप भोंगळ, बाबासाहेब गुंजाळ, संजय येवले, डॉ.

सचिन हारदे, पुष्पाताई भुजाडी, भगवान राजगुरू दत्तात्रय तागड, राजेंद्र एकनाथ भोंगळ, आदिनाथ गुंजाळ यांच्यासह आदी संचालक उपस्थित होते.



## संत सावता महाराज–संत नामदेव महाराज पुण्यतिथी सप्ताहास प्रारंभ

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथे संत शिरोमणी सावता महाराज व संत नामदेव महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित सप्ताहास बुधवार (दि. ५) पासून उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ होत आहे. सावता महाराज मंदिरात होणाऱ्या या सप्ताहानिमित्त विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडा भजन, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण वाचन, सायंकाळी ४ ते ६ सावता महाराज चरित्र वाचन, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, तर रात्री ७ ते ९ या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.

या सप्ताहात सचिन महाराज पुंड (शिंगवे तुकाई), शिवानंद महाराज दहातोंडे (चांदा), रामेश्वर महाराज शास्त्री (घोडेगाव), रामायणाचार्य ज्ञानेश्वर महाराज तांबे (जेऊर हैबती) आणि शुभम महाराज कांडेकर (उंबरगाव) यांची कीर्तने होणार आहेत.

वैकुंठवासी ह.भ.प. गणेश महाराज चांदेकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प. देविदास महाराज आडभाई यांचे सकाळी ९ ते ११ या वेळेत विशेष कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तसेच रात्री ७ ते ९ या वेळेत कृष्णा महाराज शिंदे (छत्रपती संभाजीनगर) आणि बाळकृष्ण महाराज भालके (चांदा) यांची कीर्तने होणार आहेत.

मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता गावातून दिंडी प्रदक्षिणा व भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. तर बुधवार, दि. १२ ऑगस्ट रोजी ह.भ.प. देविदास महाराज आडभाई यांचे काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या धार्मिक सोहळ्याचा पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन संत शिरोमणी सावता महाराज व संत नामदेव महाराज सप्ताह समिती तसेच समस्त ग्रामस्थ, चांदा यांनी केले आहे.

## 'एक रुपयात दूध भेसळ ओळखणाऱ्या प्रकल्पाला राजकीय अडथळे'

### २०२२ मधील माजी कुलगुरूंचे वक्तव्य पुन्हा चर्चेत

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राज्यात अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली दूध व अन्य अन्नपदार्थांतील भेसळीविरोधात सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे भेसळ करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर गुजरातमधील आनंद कृषी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. मदनगोपाल वार्ष्णेय यांनी २०२२ मध्ये केलेले वक्तव्य पुन्हा चर्चेचा विषय ठरले आहे.

मार्च २०२२ मध्ये देवळाली प्रवरा येथे आण्णासाहेब पाटील कदम शेती व ग्रामविकास प्रतिष्ठान आयोजित दूध उत्पादक शेतकरी



मेळाव्यात बोलताना डॉ. वार्ष्णेय यांनी दूध भेसळ ओळखण्यासाठी विकसित करण्यात आलेल्या प्रकल्पाची माहिती दिली होती. त्यांनी सांगितले होते की, अवघ्या एक रुपयात दुधातील आठ प्रकारच्या भेसळीची तपासणी करता येईल, असे तंत्रज्ञान विकसित करून त्याचे पेटंटही मिळवण्यात आले होते. या प्रकल्पाच्या निर्मितीसाठी महाराष्ट्रातील एका कंपनीला कंत्राट देण्यात आले होते. मात्र गुजरात आणि महाराष्ट्रातील राजकीय हस्तक्षेपामुळे हा प्रकल्प पुढे जाऊ शकला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली होती. डॉ. वार्ष्णेय यांनी भारतातील दुग्ध व्यवसायाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले होते की, जगातील दूध उत्पादन वाढीचा दर सुमारे १.३ टक्के असताना भारतात तो ६.५ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. देशात दरवर्षी सुमारे २०८ दशलक्ष टन दूध उत्पादन होत असून त्यातून अर्थव्यवस्थेत लाखो कोटी रुपयांची भर पडते.

## महात्मा फुले कृषी विद्यापीठात 'फुले स्पर्धा परीक्षा फोरम'ची स्थापना

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त महात्मा फुले कृषी विद्यापीठात 'फुले स्पर्धा परीक्षा फोरम'ची स्थापना करण्यात आली. यानिमित्त करिअर संधी व व्यक्तिमत्त्व विकास या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन डॉ. नानासाहेब पवार सभागृहात करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. विलास खर्चे होते. ते म्हणाले, आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना योग्य करिअर मार्गदर्शन मिळावे, त्यांच्यातील संभ्रम दूर व्हावा आणि सक्षम शास्त्रज्ञ व अधिकारी घडावेत, यासाठी हा फोरम उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार संधी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठाने स्पर्धा परीक्षा, उद्योजकता व हायटेक ॲग्रीकल्चर फोरमची स्थापना केली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर, डॉ. बबन जोगदंड, डॉ. बाबासाहेब फंड यांनी स्पर्धा परीक्षा, व्यक्तिमत्त्व विकास आणि कृषी क्षेत्रातील करिअर संधींवर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले. कार्यक्रमास विविध कृषी महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता, विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी तसेच १५ महाविद्यालयांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवगाव शनी मंदिराला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा

### ५ कोटींचा विकास निधी मंजूर

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव :** छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील देवगाव शनी येथील प्राचीन व जागृत शनैश्वर मंदिराला महाराष्ट्र शासनाने 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा बहाल केला असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ विकास योजनेअंतर्गत ५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्यात या मंदिराचा समावेश करण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय ३१ जुलै २०२६ रोजी ग्रामविकास विभागाने जारी केला. राज्यस्तरीय निकष समितीने प्रस्तावास मंजुरी दिल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे मंदिर परिसरातील रस्ते, पिण्याचे पाणी, स्वच्छता, भाविकांसाठी मूलभूत सुविधा, पर्यटन विकास तसेच अन्य आवश्यक कामांसाठी शासनाचा निधी उपलब्ध होणार आहे. यामुळे देवगाव शनी हे धार्मिक पर्यटनाच्या नकाशावर अधिक ठळकपणे झळकण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष महंत रामगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली देवस्थानाचा सर्वांगीण विकास सुरू असून, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे यांच्या २५ लाख रुपयांच्या निधीतून भव्य सभामंडपही उभारण्यात आला आहे.गतवर्षी झालेल्या योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि गिरीश महाजन यांनी उपस्थित राहून शनैश्वर मंदिरात दर्शन घेतले होते. त्यावेळी देवस्थानाचा तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात समावेश करण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन देण्यात आले होते.जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे हा दर्जा मिळाल्याचा आनंद व्यक्त केला. तर शिवगिरी आश्रमाचे संदीपान महाराज यांनी या निधीमुळे भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला.

## व्हाईस ऑफ मीडिया आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या राज्य संयोजक पदी गोरक्ष नेहे, गायत्री ढवळे राज्य कोषाध्यक्षपदी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** पत्रकारांच्या हक्कांसाठी आणि सक्षमीकरणासाठी कार्यरतअसणार्या व्हाईस ऑफ मीडिया या आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटनेच्या राज्यकार्यकारणी मध्ये संगमनेरचे पत्रकार गोरक्ष नेहे यांची राज्य संयोजकपदी तर श्रीगोंदा येथील महिला पत्रकार सौ. गायत्री ढवळे यांची राज्य कोषाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली असल्याची घोषणा संघटनेचे रराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे व प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के यांनी केली.





गोरक्ष नेहे हे गेल्या सुमारे वीस वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी विविध सामाजिक, विकासात्मक आणि लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने प्रभावी पत्रकारिता केली आहे. व्हाईस ऑफ मीडिया मध्ये त्यांनी मागील दोन ते तीन वर्षे अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळत संघटनात्मक कार्याला गती दिली. राज्यस्तरीय अधिवेशने, क्रेडर कॅम्प तसेच विविध संघटनात्मक उपक्रमां मध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय सचिव दिव्या भोसले, प्रदेशाध्यक्ष अनिल मस्के, राज्य संचालक गोरक्षनाथ मदने, सर्व विंगचे प्रमुख अमोल मतकर तसेच जिल्हाध्यक्ष बाळासाहेब गडाख यांच्या मार्गदर्शना खाली नेहे यांनी संघटनेत प्रभावीपणे कार्य केले आहे.तर श्रीगोंदा येथील महिला पत्रकार सौ. गायत्री ढवळे यांनीही संघटनेच्या कार्यात सक्रिय सहभाग घेत राज्यस्तरावर काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. ''संघटणा माझ्यावर जी जबाबदारी सोपवेल ती मी प्रामाणिकपणे आणि यशस्वीपणे पार पाडेन,'' अशी भावना त्यांनी जिल्हा बैठकीत व्यक्त केली होती. जिल्हा बैठकीनंतर राज्यस्तरीय पदांसाठी दोन प्रतिनिधींची नावे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार राज्य संचालक गोरक्षनाथ मदने यांनी गोरक्ष नेहे आणि गायत्री ढवळे यांच्या नावांची शिफारस राज्य कार्यकारिणीकडे केली. या शिफारशी वर अंतिम शिक्कामोर्तब करत गोरक्ष नेहे यांची राज्य संयोजक पदी तर गायत्री ढवळे यांची राज्य कोषाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

नेहे आणि ढवळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

## 'कार्बन फूटप्रिंट': पर्यावरणासमोरील वाढता धोका'

आज संपूर्ण मानव जात हवामान बदल, वाढते तापमान, अवकाळी पाऊस, ढगफुटी अर्थात कमी वेळात प्रमाणापेक्षा भरपूर पाऊस अशा पर्यावरणाच्या अनेक ऱ्हासाच्या गंभीर संकटाला सामोरे जात आहे. माझ्या मते या संकटामागील एक प्रमुख कारण म्हणजे मानवी जीवनशैलीतून निर्माण होणारे कार्बन फूटप्रिंट हे सुध्दा होय. एखादी व्यक्ती, वस्तू, सेवा किंवा कृती यांमुळे थेट किंवा अप्रत्यक्षपणे वातावरणात उत्सर्जित होणाऱ्या हरितगृह वायूंचे मुख्यतः कार्बन डायऑक्साइड चे एकूण प्रमाण म्हणजे कार्बन फूटप्रिंट होय. हे प्रमाण जितके अधिक, तितका पर्यावरणावर होणारा परिणाम अधिक गंभीर असतो.

आज आपण वापरत असलेली अति आधुनिक वाहने, घरातील वीज, उद्योगधंदे, प्लास्टिकच्या वस्तू आणि अगदी आपल्या दैनंदिन आहारामागेही कार्बन उत्सर्जन दडलेले आहे. यामुळे पृथ्वीचे सरासरी तापमान वाढत असून पर्जन्यमान, ऋतूचक्र, जैवविविधता आणि मानवी आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत.

आजच्या डिजिटल युगात आपल्या हातातील स्मार्टफोनही कार्बन फूटप्रिंटमध्ये मोलाची भर घालत आहे. स्मार्टफोनचे उत्पादन, चार्जिंग, इंटरनेटचा वापर तसेच डेटा सेंटर्समध्ये माहितीची साठवण आणि प्रक्रिया यासाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जा वापरली जाते.

**काही अभ्यासांनुसार**

साधा ई-मेल पाठवितानाही काही प्रमाणात कार्बन उत्सर्जन होते; मोठ्या अटॅचमेंटसह हा परिणाम अधिक वाढतो.

उच्च दर्जाचे व्हिडिओ दीर्घकाळ पाहिल्यास डेटा नेटवर्क आणि डेटा सेंटर्सवरील ऊर्जेचा वापर वाढतो.

क्लाउडमध्ये अनावश्यक फोटो, व्हिडिओ आणि फाईल्स साठवून ठेवल्यामुळेही ऊर्जा वापर वाढतो.

मोबाईल चार्जिंगचा कार्बन परिणाम तुलनेने कमी असला, तरी मोबाईलचे उत्पादन, नेटवर्क सेवा आणि इंटरनेट वापर यांचा एकत्रित कार्बन परिणाम खूप मोठा असतो.

तज्ज्ञांच्या मते, काही साध्या सवयी अंगीकारल्यास कार्बन फूटप्रिंट लक्षणीयरीत्या कमी करता येऊ शकतो.

गरज नसताना मोबाईल डेटा, वाय-फाय, ब्लूटूथ आणि जीपीएस बंद ठेवावेत.

अनावश्यक ई-मेल, फोटो, व्हिडिओ आणि क्लाउडमधील फाईल्स नियमितपणे हटवाव्यात.

इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा शक्य तितका दीर्घकाळ वापर करावा; वारंवार नवीन उपकरणे खरेदी टाळावीत.

ऊर्जा कार्यक्षम उपकरणांना प्राधान्य द्यावे.

सार्वजनिक वाहतूक, सायकल किंवा पायी प्रवासाचा अधिक वापर करावा.



**भिला सोनू पाटील**
जल प्रहरी पुरस्कार विजेते
जल शक्ती मंत्रालय, भारत सरकार

झाडे लावण्याबरोबरच त्यांचे संवर्धन करावे आणि ऊर्जा बचत ही प्रत्येकाची जबाबदारी मानावी.

आज ''डिजिटल डिटॉक्स'' ही केवळ मानसिक आरोग्यासाठीच नव्हे, तर पर्यावरण संरक्षणासाठीही महत्त्वाची गरज बनली आहे. आपल्या छोट्या-छोट्या सवयी बदलल्या, तर कार्बन फूटप्रिंट कमी करून पुढील पिढ्यांसाठी अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि हिरवीगार पृथ्वी निर्माण करता येईल.

''झाडे लावा, झाडे जगवा'' हा संदेश अत्यंत महत्त्वाचा असला तरी पर्यावरणाचे संपूर्ण संतुलन राखण्यासाठी तो एकटाच पुरेसा नाही. निसर्गाचे चक्र अत्यंत व्यापक आणि परस्परावलंबी आहे. त्यामुळे झाडांबरोबरच इतर अनेक बाबींवरही समान लक्ष देणे आवश्यक आहे.

हवा आणि पाण्याचे प्रदूषण कमी करणे.

प्लास्टिकचा वापर कमी करून प्रभावी कचरा व्यवस्थापन करणे.

नद्या, तलाव आणि भूजल प्रदूषणमुक्त ठेवणे व पाण्याचा पुनर्वापर वाढवणे.

जैवविविधतेचे संरक्षण करून कीटक, पक्षी, प्राणी आणि सूक्ष्मजीवांचे अस्तित्व जपणे.

जंगलांचे संरक्षण म्हणजे संपूर्ण परिसंस्थेचे संरक्षण होय.

कोळसा आणि खनिज तेलावरील अवलंबित्व कमी करून सौर व पवन ऊर्जेचा वापर वाढवणे.

दैनंदिन जीवनावश्यक वस्तू वापरतांना त्यांचा कमी वापर, पुनर्वापर आणि पुनश्चक्रण या त्रिसूत्रीचा स्वीकार करणे.

झाडे लावणे हे पर्यावरण संवर्धनाचे महत्त्वाचे औषध आहे; मात्र प्रदूषण नियंत्रण, जलसंवर्धन, ऊर्जा बचत आणि निसर्गपूरक जीवनशैली या सर्वांचा समन्वय झाल्याशिवाय पर्यावरणाचे खरे संतुलन साधता येणार नाही.

पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची किंवा पर्यावरणप्रेमींची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्या दैनंदिन जीवनातील छोटे-छोटे बदलही पृथ्वीच्या भवितव्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात. आज घेतलेला सजग निर्णय उद्याच्या पिढ्यांना सुरक्षित आणि समृद्ध पर्यावरणाची अमूल्य भेट ठरू शकतो.

**कार्बन फूटप्रिंट**

मी चालतो तिथे उमटते, कार्बनचे एक पाऊल, निसर्गाच्या विनाशाची, हीच खरी आहे चाहूल!मोबाईलचा अति वापर, प्लास्टिकचा वाढता पसारा, हळूहळू हिरवाई हिरावतो, निसर्गाचा हा रा! वृक्ष तोडून उभे करतो, काँक्रीटचे उंच डोंगर,धूर, प्रदूषण, उष्णतेमुळे, व्याकूळ झाले अंबर.चला बदलू जीवनशैली, धरतीमातेचा करू सन्मान,ऊर्जा वाचवू, वृक्ष लावू, हाच निसर्गाचा खरा मान. कमी करू कार्बनचा ठसा, जपू या पृथ्वीचा श्वास,हरित भविष्य घडविण्यासाठी, आजच करूया नवा प्रवास!

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# द•ख•ल

## दत्तात्रय लांघी निसर्ग व सामाजिक पर्यावरण जिल्हा कार्यकारणी सदस्य पदी



**श्रीरामपूर** : अकोले तालुक्यातील मवेशी येथील शिक्षक दत्तात्रय वाळू लांघी यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा कार्यकारणी सदस्यपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. निसर्ग व पर्यावरण क्षेत्रातील आवड ,वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, पर्यावरणाचे जतन, पर्यावरण जनजागृती आदी कार्याची दखल घेऊन त्यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा कार्यकारणी सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. नुकतेच त्यांना निवडीचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यांच्या निवडीबद्दल निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद दादा मोरे, उपाध्यक्ष प्रा. डॉ. अनिल लोखंडे, प्रकाश केदारी, राज्य कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब डोंगरे, जिल्हा संघटक अर्जुन राऊत, जिल्हा समन्वयक मल्हारी कडू, स्वाती अडाणे, केरूजी आभाळे, आदी सह पर्यावरण मंडळाचे पदाधिकारी व पर्यावरण प्रेमी आदींनी निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

## गुरुवारी बेलापूरात रा. स्व. संघ शाखेचा गुरुपुजन उत्सव

**बेलापूर** : श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखेचा गुरुपूजन उत्सव गुरुवारी (दि.६) ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ वाजता मेनरोडवरील जुने बालाजी मंदिरात संपन्न होत आहेत. पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहकार्यवाह महेश कर्पे या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते असून ते मार्गदर्शन करणार आहेत. संघ शाखेच्या पंचक्रोशीतील स्वयंसेवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सामाजिक समरसता मंचच्या वतीने अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीस अभिवादन



**राहुरी** : सामाजिक समरसता मंच राहुरी च्या वतीने राहुरीत एक ऑगस्ट २०२६ लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या १०६ व्या जयंती निमित्त लक्ष्मीनगर येथे लोकशाहीर आण्णा भाऊ साठे स्मारक येथे जाऊन अभिवादन करण्यात आले. सूरज राजेंद्र शिंदे यांचे बौद्धिक झाले. त्या नंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम झाला. वृक्षरोपण प्रगती विद्यालय राहुरी येथे करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व राहुरी तालुका सामाजिक समरसता यांचे संयोजक मयूर दुधाडे, प्रज्वल खैरे, सुरज शिंदे, संदीप जंगम, राहुल भिंगारकर, सोमनाथ जगधने, कांतीलाल जगधने, ज्ञानेश्वर जगधने , सोन्याबापू जगधने, निलेश जगधने, श्रीकांत शेजुळ, मिलिंद साखला, अक्षय उंडे, आदि मान्यवरांसह नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते.

# नगर - मनमाड महामार्गाच्या निषेधार्थ राहुरीकरांचा घरावर काळे झेंडे लावून निषेध

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राष्ट्रीय महामार्ग १६० वरील शिर्डी –अहिल्यानगर महामार्गाचे काम तब्बल १२ वर्षापासून रखडले आहे. नगर मनमाड महामार्गामुळे झालेल्या अपघातात अनेकांनी प्राण गमावले आहेत व त्यामध्ये अनेकांची कुटुंबे उध्वस्त झालेली आहेत. अनेक कुटुंबे निराधार झाले आहेत.

मध्यंतरी सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब पवार यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली होती त्या संदर्भात हायकोर्टाने सुद्धा यावर ताशेरे ओढले होते. अहिल्या नगर मनमाड महामार्ग ची दैना मोठ्या प्रमाणात झाली असून तयार करण्यात आलेला रस्ता एकाच पावसाने खचून गेला असून परत प्रवाशांच्या नशिबी वनवास आला आहे. रस्ता दुरुस्त होण्यासाठी अनेक मार्गाचा अवलंब करण्यात आला. रस्ता दुरुस्ती कृती समितीच्या वतीने रस्त्याचा दशक्रिया विधी घालण्यात आला अनेक प्रकारची आंदोलने करण्यात आली.

आषाढी एकादशीच्या दरम्यान पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांना विनंती वजा फलक लावण्यात आला होता. व वारकऱ्यांनी पांडुरंगाला विनंती करावी की नगर मनमाड महामार्ग पूर्ण होऊ दे. परंतु कुठल्याही




प्रकारचा परिणाम झाला नाही त्यामुळे रस्त्याचे काम करणारे निविदा धारक कंपनी मे. भारत कन्स्ट्रक्शन गुणवत्ता नियंत्रण मे. लायन्स कंपनी आणि एन एच ए आय अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराच्या निषेधार्थ राहुरीकरांनी शिर्डी अहिल्यानगर रस्ता तात्काळ पूर्ण करा अशा आशयाचे घराघरावर काळे झेंडे लावून आपला आगळावेगळा निषेध नोंदविला आहे.

नगर मनमाड महामार्गासाठी राहुरीकरांना अजून किती वर्षे वाट पहावी लागणार याचे उत्तर मात्र कुणालाही सांगता येणार नाही हे निर्विवाद सत्य आहे.

# डिग्रसच्या शेतकऱ्याची गाय २.५१ लाखांना विकली...

## बारामतीच्या शेतकऱ्याकडून खरेदी !

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : कष्टाला जर योग्य नियोजनाची जोड दिली, तर शेती आणि पशुपालन व्यवसायातूनही मोठे यश मिळवता येते, हे संगमनेर तालुक्यातील डिग्रस येथील एका प्रगतशील शेतकऱ्याने सिद्ध करून दाखवले आहे. डिग्रस येथील 'दत्तकृपा डेअरी फार्म'चे मालक आणि आदर्श गोपालक रवींद्र संजय खेमनर यांच्या एका गायीची चक्क २ लाख ५१ हजार रुपयांना विक्री झाली असून, बारामती येथील एका शेतकऱ्याने ही गाय खरेदी केली आहे. पशुपालन क्षेत्रात सहसा पंजाब किंवा इतर राज्यांतील गायींच्या मोठ्या किमतींची चर्चा होत असते.

मात्र, संगमनेरच्या ग्रामीण भागात तयार झालेल्या गायीला इतका मोठा भाव मिळाल्याने संपूर्ण तालुक्यात रवींद्र खेमनर यांचे कौतुक होत आहे. या विक्रमी विक्रीच्या निमित्ताने दैनिक राष्ट्र सह्याद्रीचे प्रतिनिधी सोमनाथ डोळे यांनी रवींद्र खेमनर यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी आपल्या यशाचे गमक सांगताना गायीच्या व्यवस्थापनावर प्रकाश टाकला. खेमनर म्हणाले की, या गायीचे आम्ही लहानपणापासूनच अत्यंत चोख नियोजन केले आहे. तिचा आहार, पिण्याचे स्वच्छ पाणी, राहण्यासाठी



सावलीची व्यवस्था आणि आरोग्याची काळजी या गोष्टींना आम्ही प्राधान्य दिले. पुढे बोलताना खेमनर यांनी इतर शेतकऱ्यांनाही प्रोत्साहित केले. ते म्हणाले, कोणतीही गोष्ट अशक्य नाही. आपण अनेकदा ऐकतो की आपल्या महाराष्ट्रात परराज्यातून महागड्या गायी आणल्या जातात. मात्र, जर आपल्या राज्यातील शेतकऱ्यांनी गाय संगोपनाचे योग्य नियोजन केले, चाऱ्याचे व्यवस्थापन आणि वेळेचे गणित पाळले, तर आपणही अशा उच्च दर्जाच्या गायी तयार करू शकतो. हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी नक्कीच शक्य आहे.

# उंबरी बाळापूर येथे लक्ष्मीआई यात्रोत्सवानिमित्त प्रसादाचे वाटप



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे मंगळवारी (दि. ४) लक्ष्मीआई यात्रोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यात्रोत्सवानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेपासूनच परिसरातील भाविकांनी दर्शनासाठी मंदिरात मोठी गर्दी केली होती.

मंगळवारी सकाळी यात्रोत्सवानिमित्त लक्ष्मीआई देवीचा शास्त्रोक्त अभिषेक आणि महापूजा अत्यंत मंगलमय वातावरणात पार पडली. पूजेनंतर देवीची मनमोहक आणि आकर्षक रूपी आरास बांधण्यात आली होती. दर्शनासाठी मंदिरात येणाऱ्या सर्व भाविकांसाठी ग्रामस्थांच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले. पहाटेपासूनच उंबरी बाळापूरसह लगतच्या गावांमधील भाविकांनी देवीच्या दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

दरम्यान, यात्रोत्सवाचे औचित्य साधून संपूर्ण मंदिर परिसर, गर्भगृह आणि प्रवेशद्वारावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. रात्रीच्या वेळी ही रोषणाई उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होती.

# मुद्रांक विक्रेत्यांची तहसीलदारांकडून कानउघाडणी

## नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी** : संगमनेर शहरातील मुद्रांक (स्टॅम्प पेपर) विक्रेत्यांकडून नागरिकांची होत असलेली आर्थिक पिळवणूक आणि टायपिंगची सक्ती याची गंभीर दखल घेत तहसीलदार धिरज मांजरे यांनी मुद्रांक विक्रेत्यांची तातडीची बैठक घेत कडक शब्दांत समज दिली. नागरिकांची गैरसोय करणाऱ्या किंवा शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

गेल्या काही दिवसांत संगमनेर शहरातील अनेक नागरिकांनी मुद्रांक सहज उपलब्ध होत नसल्याच्या तसेच मुद्रांक खरेदी करताना संबंधित विक्रेत्यांकडून टायपिंग करून घेण्याची सक्ती केली जात असल्याच्या तक्रारी केल्या होत्या. टायपिंग नको असल्यास मुद्रांकाच्या निश्चित किमतीपेक्षा ३० ते ५० रुपये अधिक आकारले जात असल्याचाही आरोप नागरिकांनी केला होता. विशेष म्हणजे, पतसंस्थांच्या कर्जप्रकरणांसाठी आवश्यक असलेला मजकूर संबंधित संस्थांकडून



उपलब्ध करून दिला जात असतानाही मुद्रांक विक्रेत्यांकडून अनावश्यक टायपिंगची सक्ती केली जात असल्याने नागरिकांना आर्थिक भुर्दंडासह मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे समोर आले होते.

या प्रकरणी तहसीलदार धिरज मांजरे यांच्याकडे व्हॉट्सॲपद्वारे लेखी तक्रार केली होती. तक्रारीची दखल घेत तहसीलदारांनी तातडीने बैठक बोलावून शासनाने निश्चित केलेल्या दराप्रमाणेच मुद्रांक विक्री करण्याचे तसेच कोणत्याही ग्राहकावर टायपिंगची सक्ती न करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. यापुढे मुद्रांकाच्या निर्धारित किमतीपेक्षा जादा रक्कम आकारणे, नागरिकांना वेठीस धरणे किंवा नियमबाह्य व्यवहार केल्याच्या तक्रारी आढळल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार धिरज मांजरे यांनी दिला. त्यांच्या या तत्पर हस्तक्षेपामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त करत तहसीलदारांचे आभार मानले आहेत.

# वाढदिवस दरवर्षी येईल..पण दादांचा तो सकाळचा फोन । पुन्हा कधीच येणार नाही!



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : माझ्या प्रत्येक वाढदिवशी सकाळी साडेसहा वाजता अजितदादांचा शुभेच्छांचा फोन यायचाच. अनेक वर्षांची ती प्रेमाची परंपरा होती. पण यंदा तो फोन येणार नाही, ही जाणीव मनाला असह्य वेदना देणारी आहे. वाढदिवस दरवर्षी येईल,पण अजितदादा पुन्हा कधीच परत येणार नाहीत अशा शब्दांत आमदार आशुतोष काळे यांनी भावना व्यक्त करताच सभागृहातील वातावरण क्षणभर स्तब्ध झाले.

कोपरगाव येथील कृष्णाई बॅन्क्वेट हॉलमध्ये आमदार आशुतोष काळे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित शुभेच्छा सोहळ्यासाठी कोपरगाव मतदारसंघातून हजारो कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावली होती. शुभेच्छा स्वीकारण्यापूर्वी उपस्थितांशी संवाद साधताना स्व. अजितदादांच्या आठवणींनी आमदार काळे यांचा कंठ दाटून आला. यावर्षी वाढदिवस साजरा करण्याची मनापासून इच्छा नव्हती.

आपल्या सर्वांचे लाडके नेते स्व. अजितदादा आपल्याला सोडून जाऊन सहा महिने झाले, पण मन अजूनही ते वास्तव स्वीकारू शकलेले नाही. आजही वाटते, दादा कुठेतरी भेटतील, पुन्हा एकदा प्रेमाने विचारपूस करतील. ही आशा मनातून जात नाही, असे ते भावूक स्वरात म्हणाले. ते पुढे म्हणाले, कार्यकर्त्यांचा उत्साह, जनतेचे प्रेम आणि आशीर्वाद पाहता वाढदिवस साजरा करावा की नाही, अशा द्विधा मनःस्थितीत होतो. मात्र कार्यकर्त्यांच्या आग्रहाचा मान राखण्यासाठी आणि जनतेचे आशीर्वाद स्वीकारण्यासाठी अत्यंत साधेपणाने वाढदिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. एका बाजूला जनतेचे अपार प्रेम आणि विश्वास आहे; पण दुसऱ्या बाजूला दादा नसल्याची पोकळी मनाला सतत अस्वस्थ करते. त्यांच्या शुभेच्छांशिवाय साजरा झालेला हा पहिला वाढदिवस आयुष्यभर वेदना देत राहील.

आजही प्रत्येक क्षणी त्यांची आठवण येते, असे सांगताना त्यांचा आवाज भरून आला. स्व. अजितदादांच्या कार्याचा उल्लेख करताना आमदार काळे म्हणाले, दादांनी आम्हाला माणुसकीची वाट दाखवली. जनतेची सेवा हेच जीवनाचे ध्येय असल्याचे शिकवले. संकटांशी दोन हात करत खंबीरपणे पुढे कसे चालायचे, याची प्रेरणा दिली. आज ते आपल्यात नसले, तरी त्यांचे विचार, त्यांचे संस्कार आणि त्यांचे कार्य माझ्या प्रत्येक पावलावर मार्गदर्शक म्हणून राहणार असल्याचे त्यानी सांगितले.यावेळी हजारो कार्यकर्त्यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

## चौकशीची जाहीर नोटीस

जावक क्रमांक /२४६५/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
२रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
आकाशवाणी समोर, सावेडी, अहिल्यानगर
दिनांक २०/०७/२०२६

चौकशी अर्ज क्रमांक :- ७५५/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव :- श्री. विरोबा महाराज मंदिर ट्रस्ट, दाढ, बु, ता. राहता जि. अहिल्यानगर

अर्जदार :- श्री. भागचंद ठमाजी गाडेकर रा. हरण धोंछयाई रोड, गाडेकर वस्ती. मु.पो. दाढ बु. ता. राहता जि, अहिल्यानगर सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे वर नमुद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? न्यासाची स्थावर मिळकत आहे काय?

अ) जंगम मिळकत :- जंगम मिळकत साधारणतः रक्कम रु. १०,०००/- सोबत यादी जोडलेली आहे.

ब) स्थावर मिळकत (वर्णन):- गाव मौजे दाढ बु. ता. राहाता, जि. अहिल्यानगर येथील दगड, विटा, चुना, बांधकाम ७१X५४ दिपमाळ ६०X७८ उत्तरेस बखळ जागा ७१X२३ यांसी ग्रामपंचायत मिळकत क्र. ४८९

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहा. धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर.**

# माजी विद्यार्थी हीच महाविद्यालयाची मोठी संपत्ती : मीनाताई जगधने



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात माजी विद्यार्थ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून, तेच संस्थेची खरी संपत्ती असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या प्रमुख मीनाताई जगधने यांनी केले. त्या रा. ब. नारायणराव बोरावके कॉलेज (स्वायत्त), श्रीरामपूर येथे रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित माजी विद्यार्थी मेळाव्याच्या अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलत होत्या.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. डॉ. बापू थोरात (गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयातील आठवणींना उजाळा देत रयत शिक्षण संस्थेने दिलेल्या संस्कारांमुळेच जीवनात यश मिळाल्याची भावना व्यक्त केली. तसेच भविष्यात महाविद्यालयाच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रा. प्रमोद निर्मळ व प्रा. गोरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य प्रा. डॉ. प्रवीण बडधे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती देताना रयत पोर्टलवर महाविद्यालयाच्या ९३ हजार ६७२ माजी विद्यार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी झाल्याचे सांगितले. महाविद्यालयाच्या जडणघडणीत माजी विद्यार्थ्यांचे योगदान नेहमीच मोलाचे राहिल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात महाविद्यालयास आर्थिक सहकार्य करणारे प्रा. कीर्ती अमोलिक, प्रा. कल्पना चौधरी, प्रा. एस. बी. बावके व प्रा. पी. एस. जगधने यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. डॉ. शरद शेळके यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अश्विनी आगळे यांनी, तर आभार उपप्राचार्य डॉ. अनुप दळवी यांनी मानले. मेळाव्यास माजी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## गोविंदराव आदिक स्मृतिदिनीनिमित्त साखर कामगार रुग्णालयास आधुनिक सुविधांची भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : खासदार गोविंदराव आदिक यांच्या स्मृतिदिनानिमित्त आदिक परिवार व महाराष्ट्र कृषी समाज संघटना (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने श्रीरामपूर येथील साखर कामगार रुग्णालयात रुग्णहिताचा उपक्रम राबविण्यात आला. रुग्णालयासाठी अत्याधुनिक वॉटर फिल्टर तसेच खासगी कक्ष क्रमांक १ चे संपूर्ण नूतनीकरण करून त्यामध्ये एसी, टीव्ही, फ्रिजसह आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या सुविधांचे लोकार्पण राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश आदीक व माजी लोकनियुक्त नगराध्यक्षा तथा महाराष्ट्र कृषी समाज संघटनेच्या अध्यक्षा अनुराधाताई आदीक यांच्या हस्ते झाले. यावेळी साखर कामगार रुग्णालयाचे अध्यक्ष अविनाश आपटे, वैद्यकीय संचालक रविंद्र जगधने, अरुण पाटील नाईक, डॉ. बापूसाहेब आदिक, गफार पोपटिया, मुक्तारभाई शहा, साजिदभाई मिर्झा, प्रकाश ढोकणे, अर्चनाताई पानसरे, तोफिक शेख, रियाज पोपटिया, जयश्रीताई शेळके, विजय शेळके, जय कर्मगर, जमीरभाई शेख, दीपक निंबाळकर, नानासाहेब तांबे, प्रशांत खंडागळे, सुमित मुथा, नितीन गवारे, आदित्य आदीक, अक्षय नाईक, डॉ. संगीता फासाटे, अशोक कटारे, अविनाश नागरे, सोहेल शेख, गोपाल वायनदेशकर, ऋतिक जाधव, रंजन वाव्हळ, अनिरुद्ध भिंगारवाला, आप्पासाहेब दुशिंग आदी उपस्थित होते. रुग्णांना अधिक दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले.

## राहुरी नगरपरिषद, राहुरी
## ता. राहुरी जिल्हा-अहिल्यानगर पिन कोड ४१३७०५
## राहुरी नगरपरिषद, राहुरी शहर स्वच्छता विभाग

जा.क्र. कावि०९/५/२/आरोग्य /२०२६ दिनांक: ०३/०८/२०२६

**आरोग्य विभाग जाहीर ई-निविदा सूचना २०२६-२७**

मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद, राहुरी ता. राहुरी जि. अहिल्यानगर यांचेकडून खालील नमुद कामासाठी शासनमान्य नोंदणीकृत व पात्र संस्थेद्वारे ई-निविदा प्रणालिद्वारे निविदा मागविणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकिय रक्कम (रू) | बयाणा रक्कम (रू) | निविदासंच (फार्म) फी (रू) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत तसेच घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०२६ अन्वये राहुरी शहरात निर्माण होणा-या कच-याचे वर्गीकृतरित्या संकलन करुन नगरपरिषदेच्या कचरा डेपो येथे वाहतूक करणे, दररोज संपूर्ण शहरातील गटार साफ करणे, झाडू सफाई करणे, गवत काढणे, मृत जनावरे उचलणे इ. कामे करणे या कामाकरिता अनुभवी अभिकर्त्यांची नियुक्ती करणे. | १,९८,९४,४००/- | १,९८,९४४/- | ५०००/- | १२ महिने |

**निविदा प्रसिद्धी तपशील**

| | | |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन निविदा प्रसिद्ध करणे व डाउनलोडिंग करणे व बिड सबमिशन करणे. | दिनांक : ०४/०८/२०२६ ते दिनांकः १०/०८/२०२६ सायं ५.०० पर्यंत |
| २. | प्री-बीड मिटिंग | दिनांक ०६/०८/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता (मा. मुख्याधिकारी यांच्या दालनात) |
| ३. | तांत्रिक लिफाफा उघडणे (शक्य झाल्यास) | दिनांक : १२/०८/२०२६ सायं ५ वा. पर्यंत (शक्य झाल्यास) |
| ४. | आर्थिक लिफाफा उघडणे - (शक्य झाल्यास) | दिनांक : १४/०८/२०२६ सायं ५ वा. पर्यंत (शक्य झाल्यास) |

या निविदेच्या संपूर्ण अटी-शर्तीसह महाराष्ट्र शासनाचे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहायला मिळेल.

**(अभिजित हराळे)**
**मुख्याधिकारी राहुरी नगरपरिषद, राहुरी**

# पान १ वरुन

## 'गुंगी गुडिया'वरून काँग्रेस-राष्ट्रवादी आमनेसामने

करत, 'गुंगी गुडिया' काय ही भाषा? मी राष्ट्रवादीच्या विरोधात लढले आहे, पण एका महिला उपमुख्यमंत्र्यांविषयी अशा प्रकारचे शब्द वापरणे चुकीचे आहे, असे मत व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला पदाधिकाऱ्यांनीही काँग्रेसवर टीका करत, सुनेत्रा पवार या सकाळपासून रात्रीपर्यंत जनतेच्या प्रश्नांसाठी काम करत असल्याचे सांगत त्यांच्या अपमानाबद्दल काँग्रेसने बिनशर्त माफी मागावी, अन्यथा योग्य पद्धतीने उत्तर दिले जाईल, असा इशारा दिला. सुनेत्रा पवार यांच्यावरील काँग्रेसच्या टीकेमुळे महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील शाब्दिक संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. या वादावरून राज्यातील राजकीय वातावरण आणखी तापण्याची चिन्हे दिसत असून, येत्या काही दिवसांत हा मुद्दा अधिक गाजण्याची शक्यता आहे. काँग्रेस कार्यालयात राष्ट्रवादीचे आंदोलन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषद सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सूरज चव्हाण आपल्या समर्थकांसह काँग्रेसच्या कार्यालयात दाखल झाले. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत काँग्रेसच्या भूमिकेचा निषेध केला. सुनेत्रा पवारांची सार्वजनिक माफी मागावी, अशी मागणी करत काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

## माजी राज्यपाल, शिक्षणमहर्षी डी. वाय. पाटील यांचे निधन

त्यांचे पुत्र डॉ. संजय डी. वाय. पाटील, सतेज उर्फ बंटी डी वाय पाटील, विजय डी. पाटील, डॉ. अजिंक्य डी. वाय. पाटील यांच्यासह कन्या डॉ. नंदिता पालशेतकर आणि इतर सदस्य शिक्षण व आरोग्य क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचे नातू ऋतुराज पाटील हेही सार्वजनिक जीवनात सक्रिय आहेत.२२ ऑक्टोबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील अंबाप या एका छोट्याशा शेतीप्रधान गावात त्यांचा जन्म झाला. एका साध्या बहुजन शेतकरी कुटुंबातून पुढे येत त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.त्यांच्या घरात राजकीय आणि सामाजिक वारसा आहे. त्यांचे पुत्र सतेज पाटील (माजी गृहराज्यमंत्री, महाराष्ट्र) आणि डॉ. संजय डी. पाटील, तसेच नातू ऋतुराज पाटील हे देखील राजकारण आणि समाजकारणात सक्रिय आहेत.डी. वाय. पाटील यांनी वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षी सक्रिय राजकारणातून काहीसा संन्यास घेत शिक्षणाचा वटवृक्ष उभारण्यास सुरुवात केली. त्यांनी १९८३ मध्ये नवी मुंबईत 'रामराव आदिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी' या पहिल्या अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना केली. नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियम हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक मानले जाते. या स्टेडियममध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामने, आयपीएल, फुटबॉल स्पर्धा आणि विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन झाले आहे.

## बाल लैंगिक शोषणाचा काळाबाजार!

हून अधिक बाल लैंगिक शोषणाशी संबंधित क्लिप्स आढळल्या. यापूर्वी त्याची काही सोशल मीडिया खाती बंद करण्यात आली होती. तरीही बनावट खात्यांच्या माध्यमातून तो आक्षेपार्ह साहित्याची देवाणघेवाण करत असल्याचा संशय आहे. त्याच्याविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७-बी आणि पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, बाल लैंगिक शोषणाशी संबंधित साहित्याबाबत कठोर भूमिका घेत ॲपलने काही काळासाठी टेलिग्राम ॲप आपल्या ॲप स्टोअरवरून हटविले होते. कंपनीच्या म्हणण्यानुसार, मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन करणारे साहित्य हटविल्यानंतर आणि संबंधित खात्यांवर कारवाई झाल्यानंतर ॲप पुन्हा उपलब्ध करून देण्यात आले. टेलिग्रामनेही अशा साहित्याविरोधात अधिक कठोर तांत्रिक उपाययोजना लागू करण्यास सुरुवात केली आहे. ही कारवाई केवळ गुन्हेगारांना पकडण्यापुरती मर्यादित नाही. पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि समाजाने मुलांच्या डिजिटल वापरावर जागरूक देखरेख ठेवणे, सायबर साक्षरता वाढविणे आणि संशयास्पद ऑनलाइन व्यवहारांची त्वरित माहिती पोलिसांना देणे ही काळाची गरज बनली आहे. इंटरनेट हे ज्ञानाचे प्रभावी माध्यम असले तरी त्याचा गैरवापर समाजासाठी अत्यंत घातक ठरू शकतो.

# भानसहिवरा येथे महिला बचत गटांच्या मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ५० लाखांच्या सीआयएफ निधीचे धनादेश वितरित

**नेवासा :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) तालुका व्यवस्थापन कक्ष आणि आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने नेवासा तालुक्यातील भानसहिवरा येथे आयोजित महिला बचत गटांच्या मेळाव्याला हजारो महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिस महिला प्रभाग संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते महिला बचत गटांना सुमारे ५० लाख रुपयांच्या सीआयएफ (कम्युनिटी इन्व्हेस्टमेंट फंड) निधीच्या धनादेशांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रत्नमाला विठ्ठलराव लंघे पाटील होत्या. मेळाव्यात महिला सक्षमीकरण, बचत गटांची आर्थिक प्रगती आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक महिलांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी बोलताना आ. विठ्ठलराव लंघे पाटील यांनी नेवासा तालुक्याचा सर्वांगीण विकास हेच आपले ध्येय असल्याचे सांगत, महिला सक्षमीकरणाशिवाय विकास शक्य नसल्याचे स्पष्ट केले. महिला जबाबदारीने काम करून कुटुंबासह समाजाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्य व केंद्र सरकार बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना राबवत असून, नेवासा तालुक्यात आगामी काळात दोन ते अडीच हजार बचत गटांची स्थापना करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती त्यांनी दिली. महिलांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन स्वावलंबी बनावे, असे आवाहनही त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात रत्नमाला लंघे पाटील यांनी महिलांच्या प्रश्नांसाठी लंघे कुटुंब कायम कटिबद्ध राहील, असे सांगत बचत गटांच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारून आपल्या कुटुंबाचे भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. यावेळी नेवासा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, गटविकास अधिकारी संजय लखवाल, भाजप तालुकाध्यक्ष प्रतापदादा चिंधे पाटील, ॲड. रामेश्वर सुरुंग आदींनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी, महिला बचत गटांच्या पदाधिकारी, सीआरपी आणि तालुकाभरातील हजारो महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे स्वागत मनीषा तनपुरे व निर्मला कांबळे यांनी केले, तर आयोजनासाठी महिला बचत गटांच्या पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.


## अपर जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

क्रमांकः २०२६/आरटीएस-५९/वसरणी (नांदेड)/अपील/सीआर-७२

### जाहीर प्रगटनाव्दारे नोटीस / समन्स

दिनांक ३१/०७/२०२६

**अर्जदार :** **१)** दुर्गादास पन्नालाल अग्रवाल, वय ५९ वर्ष व्यवसाय शेती व व्यापार, रा. मौ. आखाडा बाळापूर ता. कळमनूरी जि. हिंगोली **२)** डॉ. अनिल रामेश्वर अग्रवाल, वय ५८ वर्ष व्यवसाय शेती व व्यापार, रा. रामनगर, बसस्टॅन्ड जवळ, आखाडा बाळापूर ता. कळमनूरी जि. हिंगोली **३)** शिवचरण विजयकुमार गोयंका, वय ४८ वर्ष व्यवसाय शेती व व्यापार, रा. गोयंका नगर, आखाडा बाळापूर ता. कळमनूरी जि. हिंगोली **४)** विठ्ठलदास पन्नालाल अग्रवाल, वय ५७ वर्ष व्यवसाय शेती व व्यापार, रा. मौ. आखाडा बाळापूर ता. कळमनूरी जि. हिंगोली **५)** गोपाल भगवानदास अग्रवाल, वय ५७ वर्ष व्यवसाय शेती व व्यापार, रा. शिवाजीनगर ता. हिंगोली जि. हिंगोली

**प्रतिवादी :** **१)** शकुंतला सिताराम खोले, वय ७५ वर्ष व्यवसाय घरकाम **२)** लक्ष्मीकांत सिताराम खोले, वय ५० वर्ष व्यवसाय व्यापार व शेती **३)** उषा उत्तमराव सरवंदे, वय ६१ वर्ष व्यवसाय घरकाम, वरील सर्व रा. स्टेशनरोड बुधवार पेठ वसमत ता. वसमत जि. हिंगोली **४)** आशा सुभाषराव मेहत्रे, वय ५३ वर्ष व्यवसाय घरकाम, रा. मौ. पिंपळगाव (हवेली) ता. पुणे जि. पुणे **५)** निशाराणी शरदराव भावसार, वय ४८ वर्ष व्यवसाय खाजगी घरकाम, रा. पारीख नगर, त्रिमुर्ती चौक, नाशिक ता. नाशिक जि. नाशिक अन्वये अपील प्रकरणात रुजू होणे बाबत.

या कार्यालयात प्रकरण क्रमांक ७२/२०२६ दाखल झाले असून, त्यात आपणांस वारंवार नोटीस तामिलीसाठी पाठविण्यात आलेली आहे. परंतू सदर प्रकरणात आपण अद्यापपावेतो हजर न झाल्याने प्रतिवादी क्रमांक ४ व ५ (आशा सुभाषराव मेहत्रे, निशाराणी शरदराव भावसार) यांनी प्रकरणात उपस्थित रहावे. याव्दारे आपणांस कळविण्यात येते की, वर दर्शविलेल्या कार्यवाहीच्या सुनावणीसाठी दिनांक ०१/०९/२०२६ हा दिवस नियुक्त करण्यात आला आहे. तरी आपण त्या दिवशी स्वतः किंवा वकिलामार्फत सर्व पुराव्यासाहित वरील तारखेस या कार्यालयात मा. अपर जिल्हाधिकारी नांदेड यांचेसमोर दुपारी ०२:०० वाजता उपस्थित रहावे. उक्त तारखेस उपस्थित न राहिल्यास आपली कोणतीही सबब विचारात न घेता कार्यवाहीचा निकाल दिला जाईल.

**मा. अपर जिल्हाधिकारी नांदेड यांचे रोजनामा मान्यतेने**

**सही**
**अपर जिल्हाधिकारी, नांदेड करिता**


# नाशिक- पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी क्रांतीदिनी महामार्गावर चक्काजाम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नगर / नाशिक ;** पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी आता निर्णायक लढा उभारण्याची वेळ आली असून, ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सकाळी ९ वाजता पुणे-नाशिक महामार्गावर ठिकठिकाणी चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. हे कोणत्याही पक्षाचे किंवा एखाद्या राजकीय नेत्याचे आंदोलन नसून, भावी पिढ्यांच्या हितासाठी उभारलेले जनआंदोलन आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार सत्यजित तांबे यांनी केले.

**'शंभर वर्षांतून एकदाच अशी संधी मिळते'**

आमदार तांबे म्हणाले, ''रेल्वेसारखे मोठे विकास प्रकल्प शंभर वर्षांतून एकदाच साकार होतात. आज हा प्रकल्प आपल्या भागातून निघून गेला, तर पुढील शंभर-दोनशे वर्षांत अशी रेल्वे पुन्हा या भागात येईल, याची कोणतीही खात्री नाही. किंबहुना, अशी संधी पुन्हा मिळणारही नाही. त्यामुळे हा प्रकल्प आपल्या भागातूनच मार्गी लागला पाहिजे.''

**'संघर्ष आता अंतिम टप्प्यात'**

पुणे-नाशिक सरळ रेल्वेमार्गासाठीचा संघर्ष आता अंतिम टप्प्यात पोहोचला असल्याचे सांगताना त्यांनी नमूद केले की, ''एका बाजूला केंद्रीय मंत्र्यांकडून रेल्वे प्रकल्प



रद्द झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र दुसऱ्या बाजूला या भागातील जनतेच्या अपेक्षा अजूनही कायम आहेत. सरकार जनभावनेचा आदर करून नफा-तोट्याचा विचार बाजूला ठेवत व्यवहार्य मार्ग काढेल, अशी आमची अपेक्षा आहे.''

**केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी निर्णायक आंदोलन**

''केंद्र सरकारला जाग आणण्यासाठी आणि या प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी संपूर्ण पुणे-नाशिक महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून सर्वसामान्य जनतेचे आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या आंदोलनात सहभागी होऊन आपली ताकद दाखवावी,'' असे आवाहन त्यांनी केले.

**वाहतुकीचा वाढता ताण; रेल्वेच ठरेल पर्याय**

सध्या पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीचा ताण दिवसेंदिवस वाढत असून, दोन-अडीच तासांचा प्रवास करण्यासाठी सहा-सहा तास खर्च करावे लागत आहेत. रस्त्यांची अवस्थाही अनेक ठिकाणी खराब झाली आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे तांबे यांनी सांगितले.

**मधल्या शहरांसह पुणे-नाशिकलाही मोठा दिलासा**

या परिसरातील हजारो युवक-युवती नोकरी, शिक्षण, उद्योग-व्यवसाय आणि इतर कामांसाठी पुणे व नाशिक येथे ये-जा करतात. त्यामुळे दोन्ही शहरांवरही लोकसंख्येचा आणि वाहतुकीचा मोठा ताण वाढत आहे. सरळ रेल्वेमार्ग झाल्यास सिन्नर, संगमनेर, खेड, नारायणगाव, जुन्नर, मंचर, चाकण यांसह पुणे आणि नाशिक या दोन्ही शहरांनाही मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> **'हे आंदोलन भावी पिढ्यांसाठी'**
>
> जेव्हा जनता एकत्र येते, तेव्हा सरकारला निर्णय घ्यावाच लागतो. त्यामुळे हे आंदोलन कोणत्याही पक्षाच्या बॅनरखाली किंवा कोणत्याही नेत्याच्या नेतृत्वाखाली होणार नाही. सामान्य माणूस म्हणून प्रत्येकाने यात सहभागी व्हावे. हे आंदोलन कुणा एका व्यक्तीचे नसून भावी पिढ्यांच्या विकासासाठी आजची पिढी उभारत असलेले ऐतिहासिक जनआंदोलन आहे.
>
> **आ. सत्यजित तांबे**

**'क्रांतीदिनी रस्त्यावर उतरूया'**

''आता क्रांती करण्याची वेळ आली आहे. ९ ऑगस्ट क्रांतीदिनी सकाळी ९ वाजता जिथे शक्य असेल, तेथे नागरिकांनी रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन करावे. एकाच दिवशी आणि एकाच वेळी संपूर्ण पुणे-नाशिक महामार्ग ठप्प करून केंद्र सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला जाईल,'' असे तांबे यांनी स्पष्ट केले.

**सर्वपक्षीय नेते सहभागी होणार**

आमदार सत्यजित तांबे यांनी नाशिक पुणे सरळ रेल्वे मार्गासाठी क्रांतीदिने रास्ता रोको आंदोलनाची हाक दिली असून यामध्ये अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार राजाभाऊ वाजे खासदार डॉ अमोल कोल्हे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार निलेश लंके, आमदार शरद दादा सोनवणे, आमदार बाबाजी काळे, आमदार विलास लांडे, आमदार महेश लांडगे, माजी मंत्री माणिकराव कोकाटे, मा आ. डॉ. सुधीर तांबे, डॉ जयश्रीताई थोरात यांच्यासह विविध मान्यवर सहभागी होणार आहेत.

# वैजापूरच्या कौस्तुभ गायकेला सुवर्णपदक

## आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** येथील क्रीडा क्षेत्रात आनंदाची आणि अभिमानाची लाट पसरली आहे. मुळगाव पिंपळगाव लेंडी (तालुका सिंदखेड राजा, जिल्हा बुलढाणा) येथील रहिवासी आणि सध्या वैजापूर येथे स्थित असलेला कौस्तुभ गजानन गायके याने नुकत्याच पार पडलेल्या '१३ व्या स्टुडंट ऑलिम्पिक नॅशनल गेम्स २०२६-२७' मध्ये अप्रतिम कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. कौस्तुभने १४ वर्षांखालील गटात ५० मीटर फ्रीस्टाईल जलतरण स्पर्धेत हे चमकदार यश मिळवले.

राष्ट्रीय स्पर्धेतील या ऐतिहासिक विजयामुळे कौस्तुभची मलेशिया येथे होणाऱ्या आगामी आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी थेट निवड झाली आहे. भारताचे प्रतिनिधित्व करण्याची ही मोठी संधी कौस्तुभला मिळाली आहे.




**वाजतगाजत जंगी स्वागत आणि मिरवणूक**

राष्ट्रीय पातळीवर सुवर्णपदक जिंकून शहराचे व आपल्या मूळ गावाचे नाव उज्ज्वल करत कौस्तुभचे आगमन होताच संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले. कौस्तुभच्या या दैदिप्यमान यशाबद्दल कॉलनीवासियांनी आणि वैजापूर मित्र परिवाराने त्याची वाजतगाजत भव्य मिरवणूक काढून अत्यंत उत्साहात जंगी स्वागत केले. या वेळी त्याला फेटा बांधून, पुष्पहार अर्पण करून व शाल पांघरून सन्मानित करण्यात आले.

गल्लीबोळांत ढोल-ताशांच्या गजरात आणि फटाक्यांची आतषबाजी करत कौस्तुभची स्वागत मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गल्लीतील नागरिक, नातेवाईक, क्रीडाप्रेमी आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व स्तरांतून कौस्तुभवर कौतुकाचा वर्षाव होत असून, मलेशियातील आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी त्याला मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# कर्जाची नियमित फेडणाऱ्यांना दोन लाखांचे अनुदान द्या; अन्यथा आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** राज्य शासनाने जाहीर केलेल्या अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी घोषित करण्यात आलेले ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान अपुरे असल्याची भावना व्यक्त करत, हे अनुदान वाढवून दोन लाख रुपये करण्यात यावे, अशी मागणी वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वरे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर अनुदानाची घोषणा केली असली तरी ही रक्कम तुटपुंजी व अपुरी आहे. त्यामुळे शासनाने या अनुदानाची मर्यादा वाढवून दोन लाख रुपये करावी तसेच या योजनेचा लाभ सर्व पात्र शेतकऱ्यांना द्यावा. यामुळे शासनाबाबत शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा शेतकऱ्यांना रस्ता रोको, उपोषण, धरणे आंदोलनासारखे तीव्र आंदोलन करण्याची वेळ येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. ३० ऑगस्टपर्यंत निर्णय न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दादाजी भुसे आणि तहसीलदार राहुल सावंत यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.



# जंगलीवस्ती शाळेच्या २९ गुणवंत विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद अध्यक्षांच्या हस्ते गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** महालगाव केंद्रातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जंगलीवस्ती येथे मंगळवारी (दि. ४) गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा सोहळा उत्साहात पार पडला. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश पाटील गलांडे यांच्या हस्ते विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या २९ विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि गोल्ड मेडल देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी अभियंता राहुल आल्हाट, संतोष गायकवाड, उपसरपंच संदीप गायकवाड, केंद्रसमन्वयक रविंद्र वारूळे, ग्रामविकास अधिकारी आडेपवार, ग्रामपंचायत सदस्य शाईनाथ पटारे, संजय गुडदे, सुरेश गायकवाड, चंद्रकांत साळुंके, सतीश आल्हाट आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली.

यावेळी बोलताना अध्यक्ष गलांडे यांनी जंगलीवस्ती शाळेतील शिक्षक दाम्पत्याच्या कार्याचे कौतुक करत विद्यार्थ्यांची गुणवत्ता, पालकांचा सहभाग आणि अल्पावधीत झालेली शाळेची प्रगती अभिमानास्पद असल्याचे सांगितले. महाराष्ट्र प्रज्ञाशोध, राज्यस्तरीय मंथन, पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती, नवोदय प्रवेश तसेच जिल्हास्तरीय इंग्लिश परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवलेल्या इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पालक वर्गणीतून खरेदी केलेल्या स्पोर्ट्स ड्रेसचेही विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले. मुख्याध्यापक त्र्यंबकेश्वर मोईन यांनी शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा मांडला, तर आभारप्रदर्शन जयश्री कोळसे-मोईन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शालेय व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# मांडवे खुर्द येथील शालेय व्यवस्थापन समितीची निवड बेकायदेशीर पालक व ग्रामस्थ आक्रमक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**साकुर :** पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथ. शाळेची शालेय व्यवस्थापन समिती निवड ग्रामस्थ व पालक यांना कुठलीही पूर्वकल्पना न देता केली आहे. शाळेतील मुख्याध्यापकाने शासनाचे सर्व नियम धाब्यावर बसून गावातील काही मोजक्या लोकांना हाताशी धरून शाळा व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे.

निवडीबाबत कोणत्याही पालकांना सभेचा अजेंडा दिलेला नाही, याचा जाब पालकांनी व ग्रामस्थांनी मुख्याध्यापकांना विचारला असता त्यांनी उडवाउडुची उत्तर देत सभेच्या आदल्या दिवशी व्हाट्सअप ग्रुप वर मिटींगचे नियोजन आम्ही केले असल्याचे सांगितले. परंतु गावातील ९० टक्के पालकांना हा मेळावा कधी आहे तो आम्हाला माहित नाही. त्याची माहिती मिळाली नसल्याचे पालकांनी सांगितले.

स्तविक पाहता शासन निर्णयाप्रमाणे पालकांना मीटिंगचा अजेंडा देणे बंधनकारक असते तसे नियमाचे पालन मुख्याध्यापक यांनी केलेली नाही.

उलट पक्षी गावातील सहा ते सात पालक यांना माहिती देऊन उपस्थित राहण्यास सांगितले, त्यांच्या मर्जीतील काही पालक उपस्थित नसतानाही त्यांना या समितीमध्ये सदस्यत्व दिले आहे शासन निर्णयाची पायमल्ली करत बेकायदेशीरपणे ही निवड केली आहे.

ग्रामस्थ व पालक चौकशी करण्यासाठी शाळेत गेले असता मुख्याध्यापकांनी सांगितले की मी आज पर्यंत कधीही पालकांना अजेंडा दिलेला नाही शाळेची पटसंख्या जास्त आहे. पालकांना याची कल्पना मी तोंडी व व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून वेळोवेळी सांगत असतो तसेच आजपर्यंत शाळा व्यवस्थापन समितीने प्रोसिडिंग लिहिलेले नाही. अजेंडा नियमानुसार सात दिवस अगोदर पालकांना द्यावा लागतो, असा कुठलाही नियम त्यांनी पाळला नाही.

ावेळी पालक व ग्रामस्थ आक्रमक होत बे कायदेशीर केलेली शाळा व्यवस्थापन समिती रद्द करून, पुन्हा नव्याने शासन निर्णयास अधीन राहून शालेय व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करावी. अशी मागणी पालकांनी केली.

> शालेय शिक्षण समिती निवडीसाठी आजपर्यंत मी आल्यापासून कुठलाही अजिंठा काढलेला नाही परंतु शाळेसंदर्भात काही कार्यक्रमाचे आयोजन असेल तर विद्यार्थ्यां मार्फत पालकांना आदल्या दिवशी माहिती देण्यात येत असते शालेय शिक्ष ण समिती निवडीचा कार्यक्रम आम्हीआदल्या दिवशी व्हाट्सअप ग्रुप वर पाठविला होता तसेच मी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहे अशी माहिती मुख्याध्यापकांनी दिली आहे
>
> **प्रभारी मुख्याध्यापक.**
> **मांडवे खुर्द जिल्हा परिषद प्राथमिक शाळा**

## निधन वार्ता

### रामराव पेरणे



**राहुरी :** तांदुळवाडी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रामराव अंबादास पेरणे (वय ५४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे. गावातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात त्यांनी काम केले होते. त्यांचा स्वभाव मनमिळावू दिलदार वृत्तीचा होता. अशोक पेरणे व संपत पेरणे यांचे बंधू होत.

# पद्मश्री डॉ. विखे पाटील सैनिक विद्यालयात विद्यार्थी पदग्रहण सोहळा दिमाखात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीचा विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण सोहळा उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव, शिस्त आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा रुजविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्याला विद्यार्थी, शिक्षक व पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सातारा सैनिक स्कूलचे माजी विद्यार्थी तथा पंजाब रेजिमेंटमध्ये कार्यरत कर्नल आकाश नाईक उपस्थित होते. विद्यालयाचे कमांडंट कर्नल सुभाष घोडगेरी यांनी प्रास्ताविकातून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नव्याने निवड झालेल्या विद्यार्थी प्रतिनिधींना रँक प्रदान करून पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. प्राचार्य राजेश माघाडे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना शिस्त, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि नेतृत्वाची परंपरा जपत विद्यालयाचा लौकिक वाढविण्याची शपथ दिली. यामध्ये स्कूल कॅप्टन म्हणून कॅडेट अंश काळे, व्हाईस कॅप्टन अथर्व खापरे, स्कूल ॲडजुटंट बाळासाहेब बहिरट, क्वार्टर मास्टर ओम हातनकर, स्पोर्ट्स कॅप्टन स्वराज वारुळे आणि कल्चरल कॅप्टन प्रथमेश बोलेनवार यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच विविध हाऊससाठीही विद्यार्थ्यांची नेतृत्वपदी निवड करण्यात आली. कॅप्टन एकनाथ धनगर यांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेट्सनी प्रभावी संचलन व मानवंदना सादर करून उपस्थितांची दाद मिळविली. कर्नल आकाश नाईक यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व, देशप्रेम, शिस्त आणि समर्पण या मूल्यांचे महत्त्व पटवून देत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीलिमा पाटील यांनी केले. आयोजनासाठी सुनील आसने, शेख अखिल, अश्विनीकुमार शर्मा, हिमालय वदक, अनिता मुसळे, दीपक ढोणे, मयुर कदम, मधुकर अंत्रे, दीपक अनाप तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. केतन तेलोरे यांनी आभार मानले.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि .५ ऑगस्ट २०२६

### मिलनम डे

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६ ४७० ३४४ | १-३ | १२० ६७० ५८० | जोड १७-९३-८५-०२-३४ |

### कल्याण

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १३९ २३८ ३३७ | ३-० | १९० २८० २४४ | जोड ३१-८०-२६-७९-०५ |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२४ १६० ११५ | ७-१ | २९० ३८० ४७० | जोड ७६-३१-२५-०८-१९ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 41 245 | 126 90 677 |
| 22/06/2026 to 29/06/2026 | 366 21 245 | 118 04 158 | 689 33 779 | 168 55 249 | 579 19 289 |
| 29/06/2026 to 03/07/2026 | 144 95 249 | 127 04 789 | 257 47 269 | 157 34 266 | 255 22 679 |
| 06/07/2026 to 13/07/2026 | 558 84 356 | 120 36 790 | 237 21 470 | 150 60 136 | 277 69 144 |
| 13/07/2026 to 20/07/2026 | 130 41 155 | 680 47 368 | 128 18 350 | 379 90 136 | 150 63 300 |
| 20/07/2026 to 27/07/2026 | 360 96 114 | 277 64 770 | 259 60 145 | 189 81 579 | 179 78 170 |
| 27/07/2026 to 03/08/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 10/08/2026 | 234 90 569 | 170 8 | | | |

द•ख•ल

## टेम्पोतून दोन लाखाची रोकड चालकांनीच लांबवली

**अहिल्यानगर :** शहरात मालकाच्या टेम्पोतून दोन लाख रुपयांहून अधिकची रोख रक्कम लबाडीने चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पुणे येथील एका संशयित चालकावर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नगर पुणे रोड वरील माणिकनगर येथील रहिवासी राजेश अमृतलाल चंगेडीया (वय ६०) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आरोपी अमोल दिलीप सुरवसे (रा. मथुरा निवास, तलाठी ऑफिस जवळ, वडगाव खुर्द, पुणे) हा तक्रारदार चंगेडीया यांच्याकडे चालक म्हणून काम करत होता. दि.३० जुलै रोजी रात्री ११ वा.च्या सुमारास माणिकनगर येथील बंगल्याच्या पाठीमागे उभ्या असलेल्या टेम्पोमधून (क्रमांक चक १६ इ ३१०८) आरोपी अमोल सुरवसे याने ५०० रुपयांच्या ४१२ नोटा, म्हणजेच एकूण २ लाख ६ हजार ७०० रुपयांची रोकड मालकाच्या संमतीशिवाय पळवून नेली. ही रक्कम महिंद्रा कंपनीच्या एका पिशवीत ठेवली होती. या प्रकरणी २ ऑगस्ट रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून संशयित चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ के. बी. हे करीत आहेत.कोतवाली पोलिसांचे पथक आता संशयित आरोपीचा शोध घेत आहेत.

## शासकीय योजनांचा लाभ महिलेपर्यंत पोहोचविणार : स्वाती शिरसुल



**अहिल्यानगर :** पद्मशाली समाजातील महिलांना शासकीय योजनांची माहिती, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने नव्याने स्थापन झालेल्या पद्मशाली महिला सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या पदग्रहण व नोंदणी प्रमाणपत्र वितरण सोहळा उत्साहात पार पडला. दिल्लीगेट येथील संपर्क कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात समाजातील ज्येष्ठ महिला, माजी नगरसेविका आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मशाली समाजाच्या प्रथम महिला नगरसेविका तथा ९४ वर्षीय ज्येष्ठ समाजसेविका श्रीमती सखुबाई संदुपटला या होत्या. प्रारंभी समाजाचे कुलदैवत श्री मार्कंडेय महामुनी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी लक्ष्मीबाई गुंडू, राधाबाई गुरुड, शशिकला मुदीगंटी, विनाताई बोज्जा, अर्चनाताई बिज्या आदी मान्यवर महिलांचा सत्कार करण्यात आला.नवनिर्वाचित अध्यक्षा सौ. स्वाती शिरसुल आपल्या भाषणात म्हणाल्या की, पद्मशाली समाजातील अनेक महिला पूर्वी विडी व्यवसायावर अवलंबून होत्या. हा व्यवसाय जवळपास बंद पडल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे. अशा महिलांना शासनाच्या विविध योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी संस्था सातत्याने कार्य करणार आहे.

## जिल्हा वाचनालयाच्या चित्रकला स्पर्धेत रंगले चिमुकल्यांचे हात



**अहिल्यानगर :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शालेय चित्रकला स्पर्धेला यंदा विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कोऱ्या कागदावर आपल्या कल्पनाशक्तीला रंगांची सुंदर साथ देत चिमुकल्यांनी देशभक्ती, निसर्ग, सामाजिक संदेश आणि विविध विषयांवरील आकर्षक चित्रे साकारली. बाई इचरजबाई फिरोदिया शाळेत पार पडलेल्या या स्पर्धेत सुमारे १,१०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत स्पर्धेला भव्य स्वरूप प्राप्त करून दिले. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष वैद्य राजा ठाकूर यांच्या हस्ते झाले. यावेळी दिलीप पांढरे, राहुल तांबोळी, शिल्पा रसाळ, किरण आगरवाल, चंद्रकांत पालवे, गणेश भगत, जालिंदर बोरुडे, अमोल इथापे, नितीन भारताल, पल्लवी कुकडवाल, वर्षा जोशी, संजय गाडेकर, आर्यन मडूर, ओम केदारे आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा वाचनालय अशा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत असून भविष्यातही अशा उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप दिले जाईल, असे त्यांनी नमूद केले.

## गुरूवारी रंगणार 'प्यार दिवाना होता है' गीतमैफल



**अहिल्यानगर :** सदाबहार गायक किशोर कुमार यांच्या ९७ व्या जयंतीनिमित्त किशोरकुमार फॅन क्लब, अहिल्यानगर यांच्या वतीने पोलाद स्टील व विंटेज हिल्स यांच्या सहकार्याने बुधवार, दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी 'प्यार दिवाना होता है' या विशेष गीतमैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सावेडी येथील माऊली सभागृहात सायंकाळी ६.३० ते रात्री ९.०० या वेळेत होणार असून संगीतप्रेमींसाठी हा सुरेल पर्वणी ठरणार आहे, अशी माहिती किशोरकुमार फॅन क्लबचे अमोल खोले यांनी दिली. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी आ. जगताप, प्रमोद कांबळे, जयेश मेहता, संजोग मुथा, सुमित कोल्हे, डॉ. बापूसाहेब कांडेकर, अविनाश घुले, अभिजित देवी, आशिष भाबडा, प्रल्हाद जोशी, दिनेश गोपलानी, कुणाल डुंगरवाल, डॉ. हर्षवर्धन तनवर, डॉ. मुग्धा तनवर, हेमंत कराळे, डॉ. सुलभा पवार, डॉ. स्मिता पटारे, डॉ. दमण काशीद, राकेश गांधी, सचिन भुतारे, मनोज चोपडा, सुरज नन्नवरे, चेतन भंडारी, किरण गवते, भूषण ओस्तवाल, अभिषेक शेलार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. गेल्या १९ वर्षांपासून किशोरकुमार फॅन क्लबच्या माध्यमातून रसिकांसाठी किशोरकुमार यांच्या अजरामर गीतांची मैफल आयोजित केली जात आहे. यंदाच्या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक अजय दगडे आणि पुण्यातील सुप्रसिद्ध गायिका राधिका अत्रे किशोरकुमार यांची लोकप्रिय गीते सादर करणार आहेत.

# बोगस कचरा वेचकांच्या नावाखाली संशयितांचा वावर!

## एमआयडीसी पोलिसांना कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे निवेदन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** एमआयडीसी व नागापूर परिसरात बोगस कचरा वेचक असल्याचे भासवत परप्रांतीय तसेच बाहेरून येणाऱ्या संशयित व्यक्तींचा वाढता वावर चिंतेचा विषय बनला असून, अशा व्यक्तींची सखोल चौकशी करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत, अहिल्यानगरच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीसाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत शिवाजी थोरात यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

यावेळी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांच्यासह शकुंतला वाघमारे, इंदुबाई कटे, शारदा फजगे, ताराबाई जगधने, मंगल चांदणे आदी एमआयडीसी व नागापूर परिसरातील स्थानिक कचरा वेचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे कचरा संकलनाचे काम करणाऱ्या स्थानिक कचरा वेचकांच्या सुरक्षेचा, सन्मानाचा आणि रोजगाराचा प्रश्न या निवेदनातून उपस्थित करण्यात आला.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा, सुरक्षित वातावरणात उपजीविका करण्याचा तसेच कायद्यापुढे समान संरक्षण मिळण्याचा अधिकार दिला आहे. महाराष्ट्र पोलीस दल नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि गुन्हेगारीला आळा घालण्याचे महत्त्वाचे कार्य करत असल्याने या प्रकरणात निष्पक्ष चौकशीची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

एमआयडीसी व नागापूर परिसरातील स्थानिक कचरा वेचक गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून रस्ते, कचरा कुंड्या, नाले आणि सार्वजनिक ठिकाणांवरील सुका कचरा गोळा करून उदरनिर्वाह करत आहेत. शहर स्वच्छ ठेवण्यात त्यांचे



मोलाचे योगदान असून त्यांच्या अनेक पिढ्या याच परिसरात वास्तव्यास आहेत. त्यांच्याकडे आधार कार्ड, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्रासह सर्व आवश्यक शासकीय कागदपत्रे आहेत. इतक्या वर्षांच्या कामकाजात त्यांचा कोणत्याही गुन्हेगारी कृत्याशी संबंध आलेला नाही.

मात्र, गेल्या काही महिन्यांपासून काही परप्रांतीय तसेच श्रीरामपूरसह इतर भागांतून येणाऱ्या काही व्यक्ती कचरा वेचक असल्याचे भासवत हातात गोण्या घेऊन दिवसभर परिसरात फिरताना दिसत असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे. स्थानिक नागरिकांकडूनही अशा व्यक्ती दिवसभर परिसराची पाहणी करून रात्री चोरी, लूटमार किंवा इतर बेकायदेशीर कृत्ये करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, काही संशयित व्यक्तींविरोधात मारहाण, चोरी व लूटमारीसारख्या घटनांबाबत तक्रारी समोर आल्या आहेत. मात्र अशा घटना घडल्यानंतर संशयाची सुई अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे काम करणाऱ्या स्थानिक कचरा वेचकांकडे वळते. त्यामुळे त्यांची बदनामी होते, नागरिकांचा विश्वास कमी होतो आणि त्यांच्या रोजगारावर गंभीर परिणाम होत असल्याचे म्हंटले आहे. केंद्र शासन व राज्य शासनाच्या 'नमस्ते योजनेचाही उल्लेख करण्यात आला आहे. कचरा वेचकांना सामाजिक सुरक्षा, सुरक्षितता आणि सन्मानाने रोजगार मिळावा यासाठी शासन विविध योजना राबवत आहे. तसेच पुण्यातील 'स्वच्छ', मुंबईतील स्त्रीमुक्ती संघटना आणि कोल्हापूर येथील 'अवनी' या संस्थांनी स्थानिक कचरा वेचकांच्या सहभागातून घनकचरा व्यवस्थापनाची यशस्वी मॉडेल उभारली असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे बोगस कचरा वेचकांच्या वावरामुळे प्रामाणिक कचरा वेचकांची प्रतिमा मलिन होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे संघटनेने नमूद केले.

# प्रलंबित मागण्यांसाठी माथाडी कामगारांचे आमरण उपोषण सुरू

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** रेल्वे माल धक्क्यावरील माथाडी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे कामगार प्रशासनाने सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगारांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. सहाय्यक कामगार आयुक्तांकडे अनेक वेळा निवेदने देऊनही कोणताही ठोस निर्णय अथवा लेखी उत्तर मिळाले नसल्याने हा निर्णय घ्यावा लागल्याचा दावा आंदोलकांनी केला आहे.

उपोषणामध्ये सुनील भिंगारदिवे, जयराम आखाडे, विनोद शिरसाठ, दिपक काकडे, देवराम शिंदे, बाबासाहेब वैरागर, राजेंद्र तरटे, रोहिदास भालेराव, गौतम सैंदाणे, गोरख कार्ले, रावसाहेब बेल्हेकर, शरद बेल्हेकर, राजु धोंडे, अंबादास कोतकर, बाळासाहेब अनारसे, सचिन वाघमारे, बाबासाहेब हजारे



आदींसह कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

कामगारांनी वेळोवेळी सहाय्यक कामगार आयुक्तांकडे निवेदने सादर करून थकबाकी वसुली, वेतनातील कपातीचा खुलासा, पाठीमागे निलंबित केलेल्या कामगारांची माहिती, तसेच विविध प्रलंबित विषयांवर कारवाईची मागणी केली होती. मात्र, या निवेदनांना वेळेत उत्तर मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर ३० जुलै रोजी उपोषणाचा इशारा देण्यात आला होता.

मोठ्या संख्येने कामगार आता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत यावेळी बोलताना कामगार नेते विलास उबाळे यांनी सांगितले की, २०२१ ते २०२४ या कालावधीतील करारा संदर्भात सहाय्यक कामगार आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार मिळणारी थकबाकी अद्यापही वसूल झालेली नाही. या संदर्भात वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित कार्यालयाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. आरआरसी प्रकरणाची सद्यस्थिती, न्यायालयीन प्रक्रियेची माहिती आणि संबंधित चौकशीचा तपशीलही कामगारांना दिला जात नसल्याचा आरोप करण्यात आला. या सर्व बाबींचा खुलासा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

# राज्यभर सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारणार

## मिशन झिरो पेण्डन्सीला वेग देणार : पवळे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** राज्यातील प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतीपर्यंत दर्जेदार सिमेंटचा शेतरस्ता पोहोचविण्याचा संकल्प महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीने केला असून, अहिल्यानगरसह संपूर्ण राज्यात सिमेंटच्या शेतरस्त्यांचे जाळे उभारण्यासाठी व्यापक जनजागृती, मार्गदर्शन आणि प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याची माहिती चळवळीचे प्रणेते शरद पवळे यांनी दिली.

अहिल्यानगर तालुक्यात आयोजित करण्यात आलेल्या राज्यव्यापी शिव पाणंद शेतरस्ता जनजागरण व 'मिशन झिरो पेण्डन्सी' अभियानाला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभियानात मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवत शेतरस्त्यांशी संबंधित विविध समस्या, अडचणी आणि प्रलंबित प्रकरणे मांडली.

यावेळी बोलताना शरद पवळे म्हणाले की, राज्यातील हजारो शेतकरी आजही शेतरस्त्याअभावी स्वतःच्या शेतीपर्यंत सहज पोहोचू शकत नाहीत. अनेक सुपीक जमिनी केवळ रस्त्यांच्या अभावामुळे पडिक राहिल्या आहेत. शेतरस्त्यांशी संबंधित अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रशासकीय कार्यालयांमध्ये प्रलंबित असून, काही ठिकाणी चुकीच्या निर्णयांमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळ सातत्याने संघर्ष करत असल्याचे त्यांनी सांगितले.

या अभियानाला शरद पवळे, आशिष कासार, बाळासाहेब थोरात, पोपट शेळके, अक्षय जगताप, सचिन शेळके, सोमनाथ तोडमल, गणेश इंगळे, एकनाथ पवार, रामदास तनपुरे, विठ्ठल मिसाळ, दादासाहेब शिरसाठ, गोवर्धन शिरसाठ, कृष्णा चव्हाण, राजेंद्र शिरसाठ, जालिंदर आठरे, राहुल गट, आंबादास आव्हाड, विक्रांत कासार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## समाजातील कोणत्याही संकटात लायन्स वंचितांच्या पाठिशी : गुलाटी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** समाजातील गरजू, वंचित आणि संकटग्रस्त घटकांना आधार देण्याचे कार्य लायन्स क्लब सातत्याने करत असून, कोणतेही संकट आले तरी लायन्स व लिओ क्लब ऑफ अहमदनगरने आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती दिली आहे. कोरोनाकाळात सुरू करण्यात आलेली लंगर सेवा आजही अविरत सुरू असून, या उपक्रमाने देशासह परदेशातील लायन्स संघटनांचेही लक्ष वेधून घेतले आहे. त्याचबरोबर लिओ क्लबच्या माध्यमातून युवक-युवती मोठ्या संख्येने सामाजिक चळवळीशी जोडले जात असल्याचे प्रतिपादन पदग्रहण अधिकारी प्रविण गुलाटी यांनी केले. लायन्स क्लब ऑफ अहमदनगर आणि लिओ क्लब ऑफ अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पदग्रहण सोहळा नगर-संभाजीनगर मार्गावरील महाराजा हॉटेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या सोहळ्यास रिजन चेअरमन संदीप गोंदकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी लायन्सचे आजी-माजी पदाधिकारी, सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच सामाजिक कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सोहळ्यात लायन्स क्लबच्या अध्यक्षपदाची धुरा हरजितसिंग वधवा यांनी स्वीकारली. सचिवपदी हरिष हरवानी तर खजिनदारपदी विजय कुलकर्णी यांनी पदभार स्वीकारला.

# शिवरस्त्याचे अतिक्रमण हटविण्याऐवजी जेसीबीने बनवला रस्ता

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शिवरस्त्यावरील (पाणंद रस्ता) अतिक्रमण हटवण्याऐवजी महसूल प्रशासनाने थेट जेसीबीच्या साहाय्याने शेजारच्या खाजगी शेतजमिनीतूनच नवा रस्ता तयार केल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगर तालुक्यातील अरणगाव-खंडाळा येथे समोर आला आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य सरकार व महसूल प्रशासनाचे कडक शब्दांत कान उपटले असून, प्रथमदर्शनी खाजगी प्रतिवादींनी शिवरस्त्यावर अतिक्रमण केल्याचे स्पष्ट दिसत आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले आहे.

न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमोर मारुती लक्ष्मण आमले व इतर (रिट याचिका क्र. ७०८१/२०२६) तसेच सुनील दत्तात्रय दौंड (रिट याचिका क्र. ९३२२/२०२६)



यांच्या याचिकांवर ३ ऑगस्ट २०२६ रोजी सुनावणी झाली. तहसीलदार, अहिल्यानगर यांनी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडून ३१ जुलै २०२६ रोजी जागेची प्रत्यक्ष पाहणी व मोजणी करून शिवरस्ता मोकळा केल्याचा अहवाल छायाचित्रांसह न्यायालयात सादर केला होता.

मात्र, याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. अमोल कारभारी गवळी यांनी न्यायालयात कागदपत्रांसह स्पष्ट केले की, प्रशासनाने मूळ शिवरस्त्यावरील खाजगी प्रतिवादींचे अतिक्रमण हटवलेच नाही. उलटपक्षी, अतिक्रमणदारांनी उभारलेल्या कंपाउंड वॉलच्या बाजूला जेसीबीने दुसराच रस्ता तयार करून दिशाभूल केली आहे.

त्याच वेळी, संबंधित दुसऱ्या याचिकेत याचिकाकर्ते सुनील दौंड यांच्या वतीने ॲड. पी. व्ही. बर्डे यांनी बाजू मांडताना सांगितले की, अतिक्रमण हटवण्याऐवजी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी थेट याचिकाकर्त्याच्या शेतजमिनीतूनच बेकायदेशीरपणे रस्ता तयार केला आहे.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि सादर केलेली छायाचित्रे पाहिल्यानंतर उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या या कृतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. खंडपीठाने स्पष्ट केले की, सादर छायाचित्रांवरून खाजगी प्रतिवादींनी शिवरस्त्यावर अतिक्रमण केले असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होत आहे. महसूल व राज्य प्रशासनाने या संपूर्ण प्रकारावर स्पष्टीकरण देणारे शपथपत्र तातडीने दाखल करावे. न्यायालयाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पुढील सुनावणी अत्यंत तातडीच्या वर्गवारीत ५ ऑगस्ट २०२६ रोजी ठेवली आहे.

# चिनच्या लि-सन यांची आदर्श गाव मांजरसुंब्याला भेट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नगर एमआयडीसीतील जीकेन सिंटर मेटल्स (त्र्ह्यछ) कंपनीच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत नगर तालुक्यातील आदर्श गाव मांजरसुंबा येथे वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमासाठी चीनमधून जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि-सन यांनी विशेष उपस्थिती लावली. गावातील विकासकामे, पर्यावरण संवर्धन, जलसंधारण, शिक्षण आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागाची पाहणी करून त्यांनी मांजरसुंबा गावाचे कौतुक केले.

यावेळी बोलताना लि-सन म्हणाले की, मांजरसुंबा गावात पर्यावरण संरक्षणासाठी होत असलेले कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. या गावातील पर्यावरण संवर्धनाची बरोबरी चीनमधील अनेक प्रगत भागांशी करता येईल. येथे जाणवणारी सकारात्मक ऊर्जा चीनमधील काही विकसित गावांची आठवण करून देते. भारतात आल्यानंतर नेहमीच आनंद वाटतो. हिमालय पर्वतरांगांमुळे भारत आणि चीन




यांच्यातील भौगोलिक अंतर मोठे असले तरी दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये अधिक सांस्कृतिक आणि सामाजिक संवाद वाढला पाहिजे. हा संपर्क केवळ राजकीय पातळीवर न राहता सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. गावातील महिलांचा सामाजिक उपक्रमांमधील सक्रिय सहभाग विशेष कौतुकास्पद असून जीकेन कंपनी केवळ उद्योग व्यवसायापुरती मर्यादित नसून समाजहिताच्या विविध उपक्रमांमध्येही सातत्याने कार्यरत आहे.

या कार्यक्रमास जीकेन कंपनीचे आशिया व्हाईस प्रेसिडेंट लि-सन, राजेश मीराणी, रूपाली कदम, जालिंदर कदम, असोले, सिद्धार्थ मित्रा, सुधीर पोळ, पुरुषोत्तम रिशी, डॉ. अभिजीत कुलकर्णी, सुनील राठी, बबन हिंगे, सिद्धार्थ भोसले, विठ्ठल हंडोरे, रमेश म्हस्के, मनोज गोरे, मिलिंद जपे, सोमनाथ ठोंबरे, सारिका वाळुंज, विलास भुतकर, इंद्रभान कदम, चंद्रभान कदम, बाळासाहेब कदम, अक्षय कदम तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सायटेशन नोटीस**

प्रो.फी.जमा.रु. पान.नं. दि.२८/०७/२०२६

शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात

चौ.अ.नं.१७०३ अर्जदार

१. श्री विनायक आश्रु पोकळे रा. दिंडेवाडी ता. शेवगांव

सामनेवाला

सरकार

सदर अर्जदार हा मौजे **दिंडेवाडी** येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार **श्री. विनायक आश्रु पोकळे** यांच्या मुलाचा **शिवम विनायक पोकळे** यांचा जन्म दि.१९.०३.२०२० रोजी माऊली हॉस्पीटल शेवगांव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांचे मुलाचा जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांचे मुलाचा जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्म मृत्युची नोंद नसलेबाबत दि.०६.०७.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला जन्म/मृत्युच्या च्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार यांच्या मुलाचा जन्म/मृत्यु नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाच्या व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सवरहुन अर्जदाराचे सदरहु जन्म-मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. ३०/०८/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहुन कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म-मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील.आज दि. ३०/०७/२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी नोटीस दिले असे.

हुकमावरुन

सही/-

**तहसिलदार शेवगाव तथा तालुका दंडाधिकारी शेवगाव**

# पुणे जिल्ह्यातील २३ धरणांतून विसर्ग

## पाणीसाठा ९५ टक्क्यांवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** मुळशी धरणक्षेत्रात मंगळवारी सकाळी आठ वाजेपर्यंत तब्बल १६० मिलिमीटर पावसाची नोंद झाली. घाटमाथ्यासह धरणक्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्याने धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. जिल्ह्यातील २३ धरणांतून सुरक्षिततेच्या दृष्टीने नियोजित पद्धतीने विसर्ग सुरू असून धरणांतील एकूण पाणीसाठा १९०.२५ टीएमसी म्हणजेच ९५ टक्क्यांवर पोहोचला आहे.

मुळशीनंतर पवना येथे १०३, वडीवळे ९५, टेमघर ८७, गुंजवणी ५८, पानशेत ४६, वरसगाव ४४, आंध्रा ३६, भामा आसखेड ३५, चासकमान ३४, कळमोडी ३१, निरा देवघर ३० आणि भाटघर येथे २२ मिलिमीटर पाऊस झाला. घाटमाथ्यावरील कुंडली येथे १००, ठोकरवाडी ९३, वळवण ९०, शिरोटा ८५ आणि लोणावळा येथे ४३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

**धरणनिहाय विसर्ग (क्युसेक)**
वरसगाव १०,४४७ । पानशेत ६,११६ । खडकवासला २०,०९५ । पवना २,१०० । कासारसाई ४५० । कळमोडी १,०३४ । चासकमान ५,२०० । भामा आसखेड ५३० । आंध्रा १,४०७ । वडीवळे १,२५७ । नाझरे ३६० । गुंजवणी ९२५ । भाटघर ६,५१५ । निरा देवघर ३,२०० । वीर १७,०९३ । येडगाव ३,९४१ । वडज २,६०० । डिंभे १०,५०७ । चिल्हेवाडी ४,२०० । घोड २५,१७० । विसापूर ६० । उजनी ८५,३२० । मुळशी ९,९००.

मागील २४ तासांत धरणांमध्ये १८.५५ टीएमसी पाण्याची आवक झाली. एक जूनपासून आतापर्यंत ३३८.४१ टीएमसी पाणी धरणांमध्ये दाखल झाले आहे. वरसगाव, पानशेत, खडकवासला, कळमोडी, आंध्रा, नाझरे आणि भाटघर ही धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. टेमघर, पवना, कासारसाई, चासकमान, भामा आसखेड, वडीवळे, गुंजवणी, निरा देवघर, वीर, पिंपळगाव जोगे, येडगाव, वडज, डिंभे, चिल्हेवाडी, घोड, विसापूर, उजनी आणि मुळशी या धरणांत ८० टक्क्यांपेक्षा अधिक पाणीसाठा आहे. शेटफळमध्ये १६ टक्के साठा आहे.पावसामुळे मुठा, पवना, भीमा, भामा, इंद्रायणी, कऱ्हा, कानंदी, कुडी, मीना, घोड आणि हंगा नद्यांच्या प्रवाहात वाढ झाली आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पावसामुळे खरीप हंगामातील भात, सोयाबीन, मका, बाजरी, तूर आणि भाजीपाला पिकांना दिलासा मिळाला आहे.

## प्रतिभावान विद्यार्थ्यांना विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** कार्यसम्राट आमदार स्व. विनायक निम्हण यांच्या जयंतीनिमित्त सोमेश्वर फाउंडेशनच्या वतीने प्रतिभावान व गरजू विद्यार्थ्यांना 'विनायक निम्हण गौरव शिष्यवृत्ती' प्रदान करण्यात येणार आहे.शिष्यवृत्ती प्रदान समारंभ ५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता बालगंधर्व रंगमंदिर, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. सिम्बायोसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक बाळासाहेब अनास्कर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे.यावेळी आमदार सिद्धार्थ शिरोळे, पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महानगरपालिकेचे सभागृह नेते गणेश बिडकर आणि स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. स्व. विनायक निम्हण यांच्या प्रेरणेतून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी या शिष्यवृत्तीचे आयोजन करण्यात आले असून, नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन नगरसेवक सनी विनायक निम्हण यांनी केले आहे.



लोणी ता. आंबेगाव येथील चोरट्यांनी घरातील पेट्या बाहेर आणत त्यातील मौल्यवान वस्तू चोरून पसार झाले आहे.

## लोणीत मध्यरात्री चोरांनी मारला डल्ला
### सुमारे अडीच लाख रुपयांचा ऐवज चोरीला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** लोणी (ता.आंबेगाव) येथील सावता मळा येथे सोमवार (दि.०३) रोजी मध्यरात्री बाळू गंगाराम लोखंडे यांच्या बंदिस्त घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी चार ग्रॅम सोन्याची दोन पाने,४८ सोन्याचे मनी, २५००/ रुपये रोख रक्कम घेऊन पोबारा केला. अंदाजे सव्वा लाख रुपयांचा ऐवज चोरीला गेला. यावेळी त्यांनी घरातील पेट्या दोनशे मीटर अंतरावर नेऊन त्यातील वस्तू अस्ताव्यस्त केल्या व पेट्या तेथेच टाकून दिल्या. पहाटे पाच वाजता उठल्यावर लोखंडे यांना चोरीचा प्रकार कळला.

या संदर्भात अधीक माहिती अशी कि,बाळू गंगाराम लोखंडे हे आपले घराला कुलूप लावून शेजारच्या खोलीत झोपले होते. याचा फायदा घेऊन चोरट्यांनी येथे डल्ला मारला. याच वेळेस वरचा गलठा वस्ती येथे कौसाबाई सखाराम गायकवाड यांच्या घराची कडी कोंड्या तोडून अंदाजे सव्वा तोळे सोने चोरील गेले. या घटतेची माहिती पारगाव कारखाना पोलीस पोलिसांना समजताच घटनास्थळी संजय साळवे, मंगेश अभंग, चंद्रकांत गव्हाणे हे पोलीस कर्मचारी दाखल झाले.त्यांनी पंचनामा केला. पुढील तपास पारगाव कारखाना पोलीस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या मार्गदर्शना खाली सुरू आहे.



## सुनेत्रा पवार यांच्यावरील वक्तव्याचा निषेध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याबाबत माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मंगळवारी (दि. ३) भिगवण चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी पृथ्वीराज चव्हाण यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करून 'जोडे मारो' आंदोलन करण्यात आले.

**बारामतीत राष्ट्रवादीचे आंदोलन**

आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका, महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत चव्हाण यांच्या वक्तव्याचा निषेध केला.

राजकीय मतभेद असले तरी महिला नेतृत्वाबाबत अवमानकारक भाषा वापरणे महाराष्ट्राच्या राजकीय परंपरेला व लोकशाही मूल्यांना शोभणारे नाही, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. सुनेत्रा पवार यांच्यावर करण्यात आलेली टीका बिनबुडाची व राजकीय वैफल्यातून करण्यात आल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

महिला नेतृत्वावर वैयक्तिक टीका करून राजकारणाची पातळी घसरवू नये. सुनेत्रा पवार यांच्या कामाचे मूल्यमापन त्यांच्या कार्याच्या आधारेच व्हावे, अशी मागणी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी केली. भविष्यात महिला नेतृत्वाचा अवमान करणारी वक्तव्ये सहन केली जाणार नाहीत, असा इशाराही देण्यात आला.

## तांदळीचे राजेंद्र गदादे यांना जलव्यवस्थापन पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कवठे येमाई :** तांदळी (ता. शिरूर) येथील माजी पंचायत समिती सदस्य राजेंद्र पोपटराव गदादे यांना जलव्यवस्थापन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल बाबुराव दोंडकर स्मारक समितीचा जलव्यवस्थापन पुरस्कार जाहीर झाला आहे.

शिरूरचे माजी आमदार स्व. बाबुराव दोंडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कार्यरत असलेल्या समितीच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार व सन्मान सोहळा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता रांजणगाव गणपती येथील समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

गदादे यांनी सुमारे आठ वर्षांपूर्वी तांदळी येथील सुमारे दोन हजार एकर क्षारपड जमीन सुधारून ती लागवडीखाली आणण्यासाठी प्रयत्न केले. या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

बाबुराव दोंडकर स्मारक समिती गेल्या २९ वर्षांपासून भूमी संवर्धन, कृषी, जलव्यवस्थापन, शिक्षण, गोसंवर्धन व पर्यावरण क्षेत्रात विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सकाळ मीडिया समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार तर प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, पश्चिम महाराष्ट्राचे प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दवडघाव उपस्थित राहणार आहेत.

यावेळी जलव्यवस्थापन, पर्यावरण, कृषी व गोसंवर्धन क्षेत्रातील विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. नागरिकांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बाबुराव दोंडकर स्मारक समितीचे अध्यक्ष ॲड. धर्मेंद्र खांडरे, उपाध्यक्ष धनंजय गायकवाड व सचिव हेमंत ढमाले यांनी केले आहे.



वडगाव जहागे (ता. वेल्हा) येथील शेतकरी नवनाथ जहागे गेल्या चार वर्षांपासून जमीन नांगरता एसआरटी पद्धतीने भातशेती करत असून, सध्या भातपिकाची वाढ जोमदार झाली आहे.

## अत्रे साहित्य संमेलनाचे १३ ऑगस्टला आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सासवड :** आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, सासवड शाखेच्या संयुक्त विद्यमाने आचार्य प्र. के. अत्रे यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त २९वे आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलन गुरुवार, १३ ऑगस्ट रोजी आचार्य अत्रे सांस्कृतिक भवन, सासवड येथे आयोजित करण्यात आले आहे.



सकाळी ९.३० वाजता आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान येथे आचार्य अत्रे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संमेलनास सुरुवात होईल. सकाळी १० वाजता कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक दि. बा. पाटील, तर स्वागताध्यक्ष म्हणून प्रा. केशव मुगुटराव काकडे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे आणि जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई उपस्थित राहतील.

दुपारी १२ ते २ या वेळेत 'लोकसाहित्यातील लोकजीवन' या विषयावर परिसंवाद होणार असून डॉ. अतुल चौरे व डॉ. अमोगसिद्ध चेंडके प्रमुख वक्ते असतील. दुपारी २ ते ४ या वेळेत रवी पाटील (सीमा कवी, बेळगाव) यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन होईल. त्यानंतर संमेलनाध्यक्षांचे समारोपीय भाषण होणार आहे.

सायंकाळी ६ वाजता भरत नाट्य संशोधन मंदिर, पुणे यांच्या निर्मितीत आचार्य अत्रे लिखित 'कवडी चुंबक' या विनोदी नाटकाचा प्रयोग होणार आहे. नाट्यप्रयोगासाठी प्रवेश विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

साहित्यप्रेमी, कवी, लेखक, विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संमेलनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

यावेळी ॲड. अण्णासाहेब खाडे, बंडू जगताप, शांताराम पोमण, नंदकुमार जगताप, हेमंत ताकवले, संतोष काकडे, शशिकला कोलते, बाळासाहेब मुळीक व सतीश पाटील उपस्थित होते.

## अल्ताफ शेख यांची काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**यवत, ता. दौंड :** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या



मान्यतेने पुणे ग्रामीण दक्षिण जिल्हा काँग्रेस कमिटीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये पुणे जिल्हा काँग्रेस दक्षिण उपाध्यक्षपदी अल्ताफ शेख (यवत, ता. दौंड) यांची निवड करण्यात आली आहे.

शेख यांच्या अनुभवाचा, नेतृत्वगुणांचा आणि संघटनात्मक कार्यक्षमतेचा पक्षाला लाभ होईल, असा विश्वास काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तरुण व ज्येष्ठ कार्यकर्त्यांना एकत्रित करून पक्षाची संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर भर देणार असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, जिल्हा काँग्रेस सरचिटणीसपदी रेश्मा वाघ, चिटणीसपदी रमेश शिंदे, तर जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी नानासाहेब रणदिवे, सोमनाथ सोडनवर आणि सुनिता चिलवंत यांची निवड करण्यात आली.

दौंड तालुक्यातील या सर्व पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे काँग्रेस कार्यकर्त्यांकडून स्वागत होत आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे विचार तसेच पक्षाची भूमिका तळागाळापर्यंत पोहोचवून संघटना अधिक मजबूत करण्याचे आवाहन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना करण्यात आले आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्तेतून ऊस शेतीला नवी दिशा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिंगवे-पारगाव :** भिमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने शिंगवे येथील भैरवनाथ सभामंडपात ऊस विकास मेळावा आयोजित करण्यात आला. कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींच्या माध्यमातून ऊस शेती अधिक सक्षम व उत्पादनक्षम करण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.



मेळाव्यास कारखाना चेअरमन बाळासाहेब बेंडे, उपाध्यक्ष प्रदीप वळसे पाटील, संचालक नितीन वाव्हळ, संचालक माऊली अस्वारे, संचालक मच्छिंद्र गावडे, संचालक पोपट थिटे, संचालक बाबासाहेब खालकर, संचालक रामचंद्र ढोबळे आणि संचालक बाळासाहेब घुले, तसेच संचालक मंडळातील पदाधिकारी, अधिकारी, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, सभासद आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ऊस पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर, वैज्ञानिक पद्धतीने पीक व्यवस्थापन आणि बदलत्या शेती तंत्राचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून ऊस शेतीतील विविध समस्या ओळखून त्यावर प्रभावी उपाययोजना करता येतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून ऊस उत्पादन आणि गुणवत्ता वाढविण्यावर भर द्यावा, असे आवाहन मेळाव्यात करण्यात आले.

## शेतजमिनीवर शैक्षणिक कर्ज काढून घेतले

### व्याज न भरल्याने जमीन विकण्याची वेळ

**यवत पोलिस ठाण्यात दोघांविरुद्ध २४ लाख ४५ हजारांच्या फसवणुकीची तक्रार**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**यवत :** ऑस्ट्रेलियातील शिक्षणासाठी आर्थिक मदत करण्याचे सांगून शेतजमिनीवर शैक्षणिक कर्ज काढण्यास भाग पाडले. मात्र, कर्जाचे हप्ते व व्याज न भरल्याने अखेर कर्ज फेडण्यासाठी शेतजमीन विकावी लागल्याचा आरोप करीत यवत येथील ६० वर्षीय शेतकऱ्याने दोघांविरुद्ध पोलिसांत तक्रार दिली आहे.

याप्रकरणी रमेश कुंतीलाल मांडोत आणि कल्पेश रमेश मांडोत यांच्याविरुद्ध यवत पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७५५/२०२६ अन्वये भारतीय दंड विधानातील कलम ४०६, ४२०, ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार युसुफ अब्दुलरेहमान पठाण यांचा यवत येथे पूर्वी मोटार वायडिंगचा व्यवसाय होता. रमेश मांडोत यांच्याशी त्यांचे अनेक वर्षांपासून कौटुंबिक व मैत्रीचे संबंध असल्याचे तक्रारीत नमूद आहे. मांडोत यांच्या मुलाला ऑस्ट्रेलियात शिक्षणासाठी पाठवायचे असल्याने आर्थिक अडचण असल्याचे सांगून त्यांनी पठाण यांच्याकडे मदत मागितली.

तक्रारीनुसार, मांडोत यांनी पठाण यांचे सोसायटीचे थकीत सुमारे २ लाख ५१ हजार रुपये भरून, त्यांच्या शेतजमिनीवर शैक्षणिक कर्ज काढण्यास प्रवृत्त केले. त्यानंतर पठाण व कल्पेश मांडोत यांच्या संयुक्त खात्यावर शैक्षणिक कर्जाची रक्कम जमा झाली. पहिल्या वर्षी ९ लाख ९९ हजार रुपये, तर दुसऱ्या वर्षी १४ लाख ४५ हजार रुपये, अशी एकूण २४ लाख ४४ हजार रुपयांहून अधिक रक्कम कर्जाच्या स्वरूपात जमा झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

कर्जाच्या रकमेचा वापर केल्यानंतर त्याचे व्याज नियमित भरण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, व्याज थकीत राहिल्याने बँकेकडून पठाण यांना वारंवार सूचना मिळू लागल्या. कर्जाची परतफेड न झाल्यास शेतजमीन जप्त होण्याची भीती निर्माण झाल्याने पठाण यांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये आपली जमीन विक्रीचा व्यवहार केला. त्यातून मिळालेल्या रकमेतून २६ लाख २८ हजार ७१८ रुपये बँकेत भरून कर्जाची परतफेड करून ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे.

त्यानंतर संबंधितांकडे पैसे परत मागितले असता, आज देतो, उद्या देतो, महिन्याने देतो असे सांगून टाळाटाळ करण्यात आल्याचा आरोप पठाण यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी एप्रिल २०२६ मध्ये वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दिला होता. चौकशीनंतर त्यांनी यवत पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

याप्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल गणेश झुंबर सोनवणे करीत आहेत.

# अमरावतीच्या सायलीची जागतिक झेप

## लिंडाऊ नोबेल परिषदेसाठी ११ भारतीय युवा संशोधकांत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक आणि उपकरणीकरण विज्ञान विभागातील वरिष्ठ संशोधन फेलो तथा भौतिकशास्त्र विभागातील पीएच.डी. संशोधक सायली नीलिमा राजेश अतकरे यांची जर्मनीतील ७५ व्या लिंडाऊ नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञांच्या परिषदेसाठी भारतातून निवड झालेल्या ११ युवा संशोधकांमध्ये निवड झाली आहे.

अमरावती येथील सायली अतकरे या इलेक्ट्रॉनिक आणि उपकरणीकरण विज्ञान विभागातील वरिष्ठ संशोधन फेलो सायली अतकरे असून, डॉ. श्वेता जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन करीत आहेत. धातू-सेंद्रिय संरचनांवर आधारित प्रगत नॅनो पदार्थांचा वापर करून पर्यावरणातील विषारी प्रदूषक ओळखण्यासाठी विद्युतरासायनिक संवेदक विकसित करण्यावर त्यांचे संशोधन सुरू आहे.




सायली यांचे प्राथमिक ते पदवीपर्यंतचे शिक्षण अमरावती येथे झाले. त्यानंतर त्यांनी पुण्यातील नौरोसजी वाडिया महाविद्यालयातून पदव्युत्तर शिक्षण घेतले आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संशोधनास सुरुवात केली. त्यांचे संशोधन आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकात प्रकाशित झाले आहे.

सायली यांच्या निवडीबद्दल संशोधन मार्गदर्शिका डॉ. श्वेता जगताप आणि विभागप्रमुख प्रा. वि. ल. मठे यांनी कौतुक केले. अमरावतीसारख्या शहरातून शिक्षण घेतलेल्या सायली यांनी आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवणे ही विद्यापीठासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

लिंडाऊ नोबेल परिषदेत नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ आणि जगभरातील निवडक युवा संशोधक सहभागी होतात.

विज्ञानातील नवीन दिशा आणि संशोधनाच्या संधींवर या परिषदेत विचारमंथन केले जाते. सायली यांच्या निवडीमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संशोधनाची आंतरराष्ट्रीय पातळी अधोरेखित झाली आहे.

## पोंदेवाडीत स्वखर्चातून रस्त्यांचे मुरुमीकरण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील पोंदेवाडी गावातील मखरवस्ती व पडवळवस्ती येथील अंतर्गत रस्त्यांची संततधार पावसामुळे मोठी दुरवस्था झाली होती. गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात चिखल निर्माण झाल्याने ग्रामस्थांना दैनंदिन ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

ग्रामस्थांची ही गैरसोय लक्षात घेऊन जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील आणि पंचायत समिती सदस्या अंकिता वाळुंज यांच्या मार्गदर्शनाखाली खरेदी-विक्री संघाचे माजी अध्यक्ष अनिल वाळुंज तसेच पोंदेवाडीचे माजी उपसरपंच संदीप पोखरकर यांनी स्वखर्चातून संबंधित रस्त्यांचे मुरुमीकरण केले. या कामामुळे दोन्ही वस्त्यांवरील रस्ते वाहतुकीसाठी सुरळीत झाले असून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**गहाळ जाहिर नोटीस**

मालक श्री. बाळासाहेब मारूती सातपुते वय :- ६३ रा. नाणेकरवाडी, ता. खेड, जि. पुणे. ४१०५०१ येथिल कायमचा रहिवासी असून माझे गाव मौजे नाणेकरवाडी, ता. खेड, जि. पुणे येथिल गट नं. १३७ यापैकी क्षेत्र ०० हे ०३ आर या वरील मालमत्ता क्रमांक. ०७/०८३/१४९७ व मालमत्ता क्रमांक ०७/०८३/१७६९ या सदर मिळकतीचे दिनांक. ०७/०४/१९९४ रोजीचा मुळ खरेदीखत दस्त नं. ५९६/१९९४ (खेड-१) या दस्तात लिहून देणार म्हणून श्रीमती. भामाबाई बबन नाणेकर, श्री. नामदेव पांडुरंग नाणेकर व श्री. बाबाजी पांडुरंग नाणेकर यांनी लिहून घेणार म्हणून श्री. बाळासाहेब मारूती सातपुते, ही दस्त गहाळ झालेले आहे. त्याबाबत श्री. बाळासाहेब मारूती सातपुते यांनी १०/०५/२०२६ रोजी Pune City, Pune यांच्याकडे तक्रार केली आहे. यासी लास्ट रिपोर्ट नं.५०३/२०२६ पडला आहे. सदरचा मुळ दस्त कोणास सापडल्यास Pune City, pune जमा करावा अथवा माझा फोन नंबर. ९८८१८४०१०१ वर संपर्क करावा.

दिनांक: 05/08/2026

ॲड. विकास. एस. राऊत
चाकण, पुणे. मो.9881840101

# द•ख•ल

## मिशन आपुलकी अंतर्गत जिल्हा परिषद शाळांना ६ लाखांचे संगणक भेट



**तिसगाव :** जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी आणि डिजिटल शिक्षणाला चालना मिळावी या उद्देशाने 'मिशन आपुलकी' अंतर्गत पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांना सुमारे ६ लाख रुपये किमतीचे १४ संगणक भेट देण्यात आले.मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या संकल्पनेतून 'मिशन आपुलकी' हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमातून तालुक्यातील अनेक शाळांना रोख तसेच वस्तूरूपाने मोठ्या प्रमाणात मदत मिळत आहे.यावर्षी टाटा इलाक्षी कंपनीचे सिनियर टेक्निकल हेड श्री. भगवानराव अकोलकर यांनी कंपनीच्या सीएसआर निधीतून पाथर्डी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांसाठी १४ संगणक उपलब्ध करून दिले. यापूर्वीही गेल्या वर्षी कंपनीने सुमारे २५ लाख रुपये किमतीचे ६३ संगणक विविध शाळांना वितरित केले होते. यंदाच्या टप्प्यात करंजी, घाटशिरस, मढी, चैतन्यनगर, भडकेवस्ती आणि बोरसेवाडी येथील जिल्हा परिषद शाळांना संगणकांचे वाटप करण्यात आले. अशोक मरकड आणि संगीता अकोलकर यांनी विद्यार्थ्यांसह पालकांशी सातत्याने संवाद साधून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची जाणीव करून दिल्यामुळे शाळेची पटसंख्या वाढल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक मरकड सर यांनी उपस्थितांचे आभार मानून देवस्थानकडे शाळेसाठी प्रिंटरची मागणी केली. या कार्यक्रमास कल्याण लवांडे, रामदास आव्हाड, भगवान मरकड, बाळासाहेब मरकड, संभाजी मरकड, पोपट मरकड, सुदाम मरकड, गणेश मरकड, गोकुळ निमसे, महेश मरकड, मच्छिन्द्र मरकड, हिराबाई अकोलकर तसेच आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## कारंजकर कुटुंबाकडून शिक्षक-सेवकांचा गौरव



**श्रीगोंदा :** महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या इयत्ता पाचवी व आठवीतील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पाच विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळविण्याचा मान पटकावला आहे. या यशामुळे विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची पुन्हा एकदा प्रचिती आली असून संपूर्ण परिसरात विद्यालयाचे कौतुक होत आहे. या अभिमानास्पद यशानिमित्त कारंजकर कुटुंबाच्या वतीने विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी विद्यालयाला आकर्षक स्मृतिचिन्ह (ट्रॉफी) प्रदान करून शैक्षणिक गुणवत्तेचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास बाबासाहेबजी भोस, काकासाहेब वाळुंजकर, दिलीप भुजबळ, रामदास ठाकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.यावेळी मान्यवरांनी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा, त्यांच्या पालकांचा तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचा गौरव करत भविष्यातही महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलने गुणवत्तेची ही परंपरा कायम राखावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापिका श्रीमती शेख एस. ए. यांनी कारंजकर कुटुंब, उपस्थित मान्यवर, पालक, पत्रकार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वात्सल्य समितीची शेवगाव तहसीलमध्ये बैठक संपन्न



**हातगाव :** शेवगाव येथील तहसील कार्यालयात तहसीलदार अकाश दहाडदे यांच्यासमवेत वात्सल्य समितीची बैठक घेण्यात आली असून या बैठकीमध्ये विविध विषयावर चर्चा होऊन थोड्याच दिवसात तालुका पातळीवर तालुक्यातील एकल महिला वर्गाचा मेळावा घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून या मेळाव्यात एकल महिलांसाठी उद्योग व्यवसाय कसा उपलब्ध करून देण्यात येईल या साठी प्रयत्न करून शासनाच्या ज्या – ज्या योजना आहेत. त्या सर्व योजना तालुक्यातील एकल महालासाठी कशा प्रेरणादाई ठरतील व त्यांच्या हाताला काम मिळेल असा एकमुखी ठराव घेण्यात येऊन त्याची अंमलबजावणीही करण्यात येईल असेही बैठकीत ठरले असल्याबाबतची माहिती एकल महिला समितीचे सदस्य प्रथमेश सोनवणे यांनी दिली आहे. या बैठकीला उमेद अभिमानचे प्रमुख फिरोज सय्यद यांच्याशीही चर्चा झाली असून या बैठकीला पंचायत समितीच्या महिला व बालकल्याण विभागाचे वरिष्ठ सहाय्यक हरिष भालेराव,तालुका संरक्षण अधिकारी प्रशांत शेळके,जगदीश शिरसाठ,तारामती दिवटे,यांचीही प्रामुख्याने उपस्थिती होती असेही शेवटी सोनवणे यांनी सांगितले आहे.

## बोधेगावमध्ये निकाळजे यांचा सत्कार



**हातगाव :** भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणीच्या सदस्यपदी शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील रावसाहेब निकाळजे यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल बालमटाकळी व बोधेगाव येथे सत्कार करण्यात आला आहे. यावेळी आबा गरड, अशोक खिळे, सुभाषराव वैद्य, बाबासाहेब वाघुंबरे, बाबासाहेब देशमुख यांचेसह इतरही ग्रामस्थ उपस्थीत होते. रामजी केसभट, अनिल कांबळे, आबासाहेब काकडे, विठ्ठलराव लोंढे, झुंबर भोंगळे यांचेसह इतरही कार्यकर्ते उपस्थीत होते.

# रस्ता चकाचक; पण अभियंते ग्रामस्थांच्या प्रश्नांपासून गायब!

## म्हसोबा मंदिराचा निर्णय गुलदस्त्यात, बसस्थानकाचाही पत्ता नाही

**बाळासाहेब गदादे**
**राष्ट्र सह्याद्री**



**चिचोंडी पाटील :** नगर-जामखेड महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले असून रस्त्याचे काम दर्जेदार व समाधानकारक पद्धतीने होत असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमधून व्यक्त होत आहे. महामार्गामुळे भविष्यात वाहतूक अधिक वेगवान आणि सुरक्षित होणार असली, तरी रस्त्यालगतच्या गावांतील नागरिक, व्यावसायिक आणि प्रवाशांच्या स्थानिक प्रश्नांकडे संबंधित अधिकाऱ्यांचे पुरेसे लक्ष आहे का, असा सवाल आता चिचोंडी पाटील ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेषतः या कामाशी संबंधित कार्यकारी अभियंता शिंदे मॅडम आणि शाखा अभियंता गायके यांच्या प्रतिसादाबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. गावातील महत्त्वाच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा व्हावी, प्रलंबित बाबींबाबत अधिकृत माहिती मिळावी, अशी ग्रामस्थांची अपेक्षा असताना संबंधित अभियंत्यांकडून अपेक्षित संवाद होत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. दूरध्वनीवरही प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार पुढे येत असल्याने महामार्गाचे काम गावातून सुरू आहे; मग संबंधित अभियंते ग्रामस्थांशी संवाद साधण्यास का टाळाटाळ करत आहेत? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

चिचोंडी पाटील येथील म्हसोबा महाराज मंदिराचा प्रश्न हा त्यातील सर्वांत संवेदनशील विषय आहे. महामार्गाच्या कामामुळे मंदिरावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्यानंतर मंदिर स्थलांतरित होऊ नये, यासाठी ग्रामस्थांनी पर्यायी नियोजन प्रशासनासमोर मांडले होते. धार्मिक भावना आणि महामार्गाचे काम या दोन्हींचा समन्वय साधणारा पर्याय ग्रामस्थांनी सुचविला असताना त्या प्रस्तावावर प्रशासनाने नेमका काय निर्णय घेतला, याची अधिकृत माहिती अद्याप ग्रामस्थांना मिळालेली नसल्याचे सांगितले जात आहे. पर्यायी नियोजन स्वीकारले की नाकारले? त्यामध्ये काही तांत्रिक अडचणी आहेत का? मंदिराबाबत अंतिम निर्णय काय आहे? याबाबत संबंधित अभियंत्यांनी ग्रामस्थांसमोर स्पष्ट भूमिका मांडणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्ष भेट होत नाही आणि दूरध्वनीवर प्रतिसाद मिळत नसल्याने संभ्रम अधिक वाढत आहे.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे चिचोंडी पाटील येथील बसस्थानकाचा. नगर-जामखेड महामार्गावरील चिचोंडी पाटील हे मोठ्या लोकसंख्येचे गाव आहे. गावासह परिसरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, नोकरदार आणि कामगार दररोज या मार्गाचा वापर करतात. मात्र एवढी प्रवासी वर्दळ असतानाही महामार्गाच्या नव्या नियोजनात गावासाठी व्यवस्थित आणि सुरक्षित अधिकृत बसस्थानकाची सुविधा नेमकी कुठे आहे, असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. उन्हाळ्यात उन्हात, पावसाळ्यात पावसात आणि इतर वेळी महामार्गाच्या कडेला उभे राहून प्रवाशांना बसची प्रतीक्षा करावी लागत असेल, तर कोट्यवधी रुपये खर्चून महामार्ग विकसित होत असताना प्रवाशांच्या मूलभूत सुविधांचा विचार का झाला नाही, असा सवाल नागरिकांचा आहे. विशेषतः शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिकृत बसथांबा व आवश्यक सुविधा महत्त्वाच्या आहेत.

**अभियंता शिंदे-गायके यांनी उत्तर द्यावे!**

म्हसोबा महाराज मंदिराबाबत ग्रामस्थांनी दिलेल्या पर्यायी नियोजनावर निर्णय काय? चिचोंडी पाटीलसारख्या मोठ्या गावासाठी अधिकृत बसस्थानकाची व्यवस्था कुठे? ग्रामस्थांच्या फोनला व भेटीच्या मागणीला प्रतिसाद का मिळत नाही? महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असताना हे प्रश्न कधी सोडविणार? संबंधित कार्यकारी अभियंता व शाखा अभियंत्यांनी गावात येऊन या प्रश्नांचा खुलासा करावा, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

## बोधेगावात एस.टी. बसला दोन थांबे देण्याची मागणी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यात शेवगाव शहरांनंतर बोधेगाव गावचा मोठा विस्तार झाला असून परिसरातील ५० खेड्यांचे केंद्रबिंदू म्हणून बोधेगावची ओळख निर्माण झाली आहे. शेवगाव – गेवराई राज्य मार्गावर असलेल्या या गावातून दररोज शेकडो प्रवाशी वर्गाची एस टी ने (लालपरी) ये – जा होत असून शेवगावहून गेवराईकडे जाणाऱ्या एस टी बसमधून जाणारे जे प्रवासी आहेत त्यांनी बोधेगांवचे तिकीट घेतल्यानंतर बोधेगाव बसस्थानकावरच वाहकाकडून उतरविले जात असून त्यातील अनेक प्रवाश्यांना बोधेगावातीलच लाडजळगाव फाट्यावर उतरायचे असल्यास उतरू दिले जात नसल्याने उतरून देण्याचे आदेश एस टी महामंडळाने द्यावेत अशा आशयाचे निवेदन भारतीय जनता पक्षाचे अहिल्यानगर जिल्हा कार्यकारिणी सदस्य रावसाहेब निकाळजे यांनी अहिल्यानगर व बीड विभाग नियंत्रकांना दिले आहे.दोन्हीही विभाग नियंत्रकांना दिल्या निवेदनात म्हटले आहे की, शेवगाव – गेवराई मार्गावर असणाऱ्या बोधेगाव गावचा मार्गालगतच मोठ्या प्रमाणात विस्तार झाला असून या ठिकाणी असणारे सध्याचे बसस्थानक गेवराईकडे जाताना गावच्या सुरुवातीला असल्याने तिथेच उतरून असंख्य प्रवाशांना बसच्या मार्गावरूनच लाडजळगाव चौकापर्यंत जवळपास १ की मी च्या अंतराने पाई जावे लागत आहे . त्यातच महिला,रुग्ण व लहान मुले यांनाही त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याने शेवगावहून निघाल्यावर बोधेगावच्या तिकिटावर प्रवाश्यांना सध्याच्या बसस्थानकासह बोधेगाव मधेच असणाऱ्या लाडजळगांव फाटा येथे आपल्या सोयीनुसार कसे उतरता येईल अशी व्यवस्था करावी.

## संभाजी ब्रिगेडचे जिल्हा संपर्कप्रमुख शामभाऊ जरे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** संभाजी ब्रिगेड पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला अधिक गती देण्याच्या उद्देशाने श्रीगोंदा तालुकाध्यक्ष इंजि. शामभाऊ जरे यांची अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

अहिल्यानगर येथे झालेल्या नियुक्ती समारंभात संभाजी ब्रिगेड पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मा. अण्णासाहेब सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाध्यक्ष मा. राजेश दादा परकाळे यांच्या हस्ते इंजि. जरे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी जिल्ह्यातील पदाधिकारी, तालुकाध्यक्ष आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. इंजि. शामभाऊ जरे यांनी श्रीगोंदा तालुक्यात सामाजिक, संघटनात्मक आणि जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. नगरपरिषद, पंचायत समिती तसेच विविध शासकीय कार्यालयांतील नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आंदोलने, धरणे, मोर्चे, निवेदने आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा केला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन,



अतिक्रमण, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, युवकांचे प्रश्न आणि प्रशासनातील पारदर्शकतेसाठी त्यांनी वेळोवेळी आवाज उठविला आहे. स्पर्धा कथित गैरप्रकार, विविध विभागांतील कथित भ्रष्टाचार, जनतेच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न तसेच सामाजिक न्यायाच्या मागण्यांसाठी त्यांनी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून अनेक आंदोलनांत सक्रिय सहभाग घेतला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार तसेच युवकांचे संघटन करण्यासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले आहे. नियुक्तीनंतर इंजि. शामभाऊ जरे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानत, पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविणे, संघटना अधिक सक्षम करणे आणि जनतेच्या न्याय्य प्रश्नांसाठी अधिक प्रभावीपणे लढा देणे, हेच माझे ध्येय राहील, असा विश्वास व्यक्त केला.

## लेखी आश्वासनानंतर मातंग समाजाचे उपोषण मागे




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील बोधेगाव येथील मातंग समाजाच्या स्मशानभूमीवरील अतिक्रमण हटवून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी प्रमोद मिसाळ व भगवान मिसाळ यांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर सुरू केलेले आमरण उपोषण सायंकाळी प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले. आमच्या स्मशान भूमीवर गावातीलच काही व्यक्तींनी अतिक्रमण केले असून ते अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र प्रशासनाकडून कारवाई न झाल्याने अखेर आमरण उपोषण सुरू केले होते. बोधेगाव येथील गट क्रमांक १६ मधील मातंग समाजाची सार्वजनिक स्मशानभूमी अनेक वर्षांपासून अस्तित्वात आहे. या जागेच्या हद्दीतून बेकायदेशीरपणे रस्ता काढण्यात आल्याचा तसेच सार्वजनिक रस्ता बुजवून स्मशानभूमीच्या जागेवर अतिक्रमणाचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी महसूल विभागाकडे तक्रार करण्यात आली असून, मंडल अधिकारी व तलाठी यांनी पंचनामा केला आहे. भूमी अभिलेख विभागाकडील मोजणी अद्याप प्रलंबित असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उपोषणकर्त्यांनी गट क्रमांक १६ ची भूमी अभिलेख विभागामार्फत तातडीने मोजणी करून स्मशानभूमीची मूळ हद्द निश्चित करावी, स्मशानभूमी व सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटवावे, संबंधितांवर अट्रोसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल गुन्हे दाखल करावेत तसेच स्मशानभूमीचे कायमस्वरूपी संरक्षण करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनात केली होती. त्यानंतर प्रमोद मिसाळ व भगवान मिसाळ यांनी आमरण उपोषण मागे घेतले. या प्रकरणी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी यावेळी आंदोलनकर्त्यांनी मागणी केली आहे.

## खेळाडूंना सार्थक वेलफेअर फाउंडेशनचे पाठबळ

### १२ हजारांचे क्रीडा साहित्य भेट

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**श्रीगोंदा :** ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सार्थक वेलफेअर फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेतील खेळाडूंना सुमारे १२ हजार रुपयांचे क्रीडा साहित्य भेट देण्यात आले.

प्रशालेतील विद्यार्थ्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केल्याची दखल घेत ही मदत करण्यात आली. भविष्यात विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन मिळावे आणि राष्ट्रीय स्तरावरही चमकदार कामगिरी करता यावी, या उद्देशाने स्वाती नामजोशी यांच्या माध्यमातून क्रीडा साहित्य प्रदान करण्यात आले.यामध्ये ६ स्पाईक शूज, ३ बॅडमिंटन सेट, २४ शटल कॉक, ३ फुटबॉल, १ व्हॉलीबॉल, १ थाळी (डिस्कस) आणि १२ टेनिस बॉल यांचा समावेश होता.

प्रशालेच्या वतीने शिक्षक अमोल कातोरे व खेळाडूंनी या साहित्याचा स्वीकार केला.मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ आणि पर्यवेक्षक नामदेव डुंबरे यांनी या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या सरावाला मोठी चालना मिळेल आणि आगामी स्पर्धांमध्ये ते अधिक चांगली कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त केला.क्रीडाशिक्षक संदीप घावटे यांनी सार्थक वेलफेअर फाउंडेशनचे आभार मानत, भविष्यातही ग्रामीण भागातील खेळाडूंना अशाच प्रकारचे सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## उक्कडगाव येथील गणपती मंदिर ट्रस्ट नोंदणीचा अर्ज फेटाळला

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** उक्कडगाव व बेलवंडी च्या सीमेवर असलेल्या गणपती मंदिराची नवीन सार्वजनिक ट्रस्ट म्हणून नोंदणी करण्यासाठी उक्कडगावच्या वतीने दाखल करण्यात आलेला अर्ज सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अहिल्यानगर यांनी फेटाळून लावला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या शासकीय मोजणीत संबंधित मंदिर उक्कडगावच्या हद्दीत नसून बेलवंडी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या हद्दीत असल्याचे स्पष्ट झाले. तसेच हे मंदिर यापूर्वीच 'श्री गणेश सेवा ट्रस्ट, बेलवंडी' (ए-१०८८) या नोंदणीकृत सार्वजनिक ट्रस्टच्या मालमत्तेत समाविष्ट असल्याचेही चौकशीत निष्पन्न झाले. उक्कडगाव येथील हेमंत हिरालाल पितळे यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम १८ अंतर्गत 'गणपती मंदिर, उक्कडगाव' या नावाने सार्वजनिक ट्रस्ट नोंदणीसाठी चौकशी अर्ज क्रमांक २३५७/२०१७ दाखल केला होता. या अर्जास गोरख दादा गोलंडे यांनी हरकत घेतली होती. अर्जदाराच्या वतीने अ‍ॅड. एस. पी. भराडे, तर हरकतदाराच्या वतीने अ‍ॅड. आर. जी. वाबळे यांनी न्यायालयात बाजू मांडली. सुनावणीदरम्यान मंदिराच्या स्थानाबाबत वाद निर्माण झाल्याने धर्मदाय विभागाने २६ फेब्रुवारी २०१९ रोजी शासकीय मोजणीचे आदेश दिले होते. त्यानुसार सादर करण्यात आलेल्या अधिकृत मोजणी नकाशामध्ये संबंधित मंदिर उक्कडगावमधील गट क्रमांक ४३ मध्ये नसून बेलवंडी गावच्या हद्दीतील गट क्रमांक १२५७ मध्ये असल्याचे स्पष्ट झाले. चौकशीदरम्यान संबंधित मंदिर हे बेलवंडी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या मिळकत क्रमांक २८६४ मध्ये असून ते आधीपासूनच 'श्री गणेश सेवा ट्रस्ट, बेलवंडी' या नोंदणीकृत ट्रस्टच्या अनुसूची-१ मध्ये समाविष्ट असल्याचे नोंदीतून स्पष्ट झाले. त्यामुळे एकाच मंदिराची दोन स्वतंत्र सार्वजनिक ट्रस्टच्या नावाने नोंदणी करणे कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरता येत नसल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. याशिवाय अर्जातील अनेक त्रुटींवरही धर्मदाय प्राधिकरणाने आक्षेप नोंदविले. ट्रस्ट स्थापनेच्या ठरावात नमूद केलेले नाव आणि नोंदणी अर्जातील नावामध्ये तफावत असल्याचे निदर्शनास आले. धार्मिक ट्रस्ट असूनही वार्षिक उत्पन्न व खर्च शून्य दाखविणे, नियमावली सादर न करणे, मंदिरातील दैनंदिन पूजा, घंटा, मूर्ती, मुकुट आदि बाबींचा अर्जात उल्लेख नसणे तसेच अर्जामध्ये आवश्यक माहिती अपूर्ण ठेवण्यात आल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# जीव मुठीत धरून विद्यार्थ्यांचा प्रवास!

## कर्जतला तातडीने जादा एस.टी. बस सुरू करा

**ऋषभ परदेशी**
**राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** राशीन बसस्थानकातून दररोज शिक्षणासाठी कर्जत येथे जाणाऱ्या शेकडो विद्यार्थी-विद्यार्थिनींना अपुऱ्या एसटी बससेवेमुळे प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सकाळच्या वेळेत बसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त गर्दी होत



असल्याने विद्यार्थ्यांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक विद्यार्थ्यांना बसच्या पायऱ्यांवर उभे राहून किंवा गर्दीत कोंडून प्रवास करावा लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

गर्दीमुळे अनेकदा विद्यार्थ्यांना बसमध्ये प्रवेशही मिळत नाही. त्यामुळे शाळेत वेळेवर पोहोचणे कठीण होत असून शिक्षणावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे. विशेषतः मुलींची होणारी गैरसोय आणि प्रवासातील असुरक्षितता याबाबत पालकांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

राशीन-कर्जत मार्गावर शाळेच्या वेळेत तातडीने जादा एसटी बस उपलब्ध करून विद्यार्थ्यांचा सुरक्षित व वेळेवर प्रवास सुनिश्चित करावा, अशी जोरदार मागणी विद्यार्थी व पालकांकडून करण्यात आली आहे. एसटी महामंडळ आणि संबंधित प्रशासनाने या गंभीर प्रश्नाची तात्काळ दखल घ्यावी, अन्यथा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पालकांसह तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या जीवाशी संबंधित या प्रश्नाकडे प्रशासन किती गांभीर्याने पाहते, याकडे संपूर्ण संपूर्ण राशीन परिसरातील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या पालकांचं लक्ष लागले आहे.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.५ ऑगस्ट २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# होमगार्ड समादेशकासह पाच लोकांविरुद्ध अ‍ॅट्रॉसिटी गुन्हा दाखल

## होमगार्ड समादेशक अरिफ इनामदार ची हकालपट्टी होणार का ?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : देव दर्शनासाठी महिलांची रांग लागलेली असताना महिलांच्या रांगेत घुसण्यास मज्जाव केल्याने आरोपींनी एका तरुणाला जातीवाचक शिवीगाळ करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना दि. ३० जुलै रोजी रात्रीच्या वेळी राहुरी शहरातील बुवासिद्ध बाबा मंदिर परिसरात घडली.

निखील राजू नारद, वय २४ वर्षे, रा. बुवासिद्ध बाबा गल्ली, राहुरी, हा तरुण दि. ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ७.३० वाजता बुवासिद्ध बाबा मंदिरात आरतीसाठी गेला होता. त्यावेळी तेथे महिलांची रांग लागलेली होती. आणि आरोपी शहारुख शेख व अरिफ इनामदार हे दोघे महिलांच्या रांगेतून जात असताना निखील नारद याने त्यांना मज्जाव केल्याने किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर रात्री १०.३० वाजे दरम्यान निखील नारद हा मंदिराकडे जात असताना आरोपींनी त्याला रस्त्यात अडवीले.

आणि म्हणाले कि, तू खालच्या जातीचा असून मंदिरात येण्याची तुला लायकी नाही, ही आमच्या मुस्लिम समाजाची दर्गा आहे, तुझे मंदिर नाही, पुन्हा इकडे फिरकलास तर जिवे मारू. अशी धमकी देत जातीवाचक शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. तेव्हा आरडा ओरडा झाल्याचा आवाज ऐकून जवळ उभ्या असलेल्या निखील नारद याच्या मित्रांनी तेथे जाऊन त्याची सुटका केली. तेव्हा आरोपींनी त्यांनाही जातीवाचक शिवीगाळ करत धमकावले. घटनेनंतर निखील राजू नारद याने राहुरी पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद दाखल केली.

त्या फिर्यादीवरून आरोपी शाहरुख फारुख शेख, आरिफ आयुब इनामदार, मुसा चॉद शेख, मोहसिन उर्फ गोप्या अकबर शेख आणि शाहबाज उर्फ मुर्गी अन्सार सय्यद, सर्व रा. बुवासिंध बाबा गल्ली, राहुरी, या पाच जणांवर गुन्हा रजि. नं. ८५२/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १८९ (२), १९०, १९१ (२), ११५ (२), ३५१ (२), ३५२ तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ चे कलम ३ (१)(आर), ३ (१)(एस), ३ (२)(व्हिए) अन्वये शिवीगाळ, मारहाण धमकी तसेच ट्रोसीटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणी श्रीरामपूर येथील उप विभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर पुढील तपास करत आहे.

### होमगार्ड समादेशक अरिफ इनामदार हकालपट्टी होणार का?

राहुरी तालुका होमगार्ड समादेशक या पदावर अरिफ इनामदार हा प्रभारी म्हणून अनेक वर्षापासून कार्यरत आहे. तो तालुका होमगार्ड समादेशक पदावर कार्यरत असताना या गुन्ह्याची घटना घडल्याने राज्याच्या होमगार्ड विभागाने व गृह मंत्रालयाने याची गंभीरतेने दखल घेतल्यास त्याला या पदावरून तात्काळ हाकलले जाऊ शकते? विशेष म्हणजे अरिफ इनामदार याच्यावर हा गुन्हा घडला त्यावेळी ते होमगार्डच्या ड्रेसवर नसल्याची चर्चा आहे, परंतु ते होमगार्डच्या ड्युटीवर असल्याचीही चर्चा होत आहे. जर ते अधिकृत ड्युटीवर असेल तर त्यांना ड्युटी करताना सिव्हिल ड्रेस वर ड्युटी करता येते का? होमगार्ड समादेशक म्हणून जर ते ड्युटीवर असेल तर बाबाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना ते आमचे देवस्थान असल्याची दमदाटी कसे करू शकतात? याची वरिष्ठ पातळीवरून चौकशी होऊन दोषी असल्यास अरिफ इनामदार वर कारवाईची गरज आहे.

### अरिफ इनामदार ह्या पशुसंवर्धन विभागातही नोकरीत कार्यरत??

प्रभारी राहुरी तालुका होमगार्ड समादेशक अरिफ इनामदार हा राहुरी तालुका पंचायत समिती अंतर्गत असणाऱ्या पशुवैद्यकीय विभागातही शिपाई म्हणून कार्यरत आहे. आता त्याच्यावर पोलिसात गुन्हा दाखल झाल्याने पशुसंवर्धन विभाग देखील त्याच्यावर काय कार्य वाई करते याकडे सगळ्यांच्या नजरा लागले आहेत.

# अल्पवयीन मुलीच्या आत्महत्ये प्रकरणी तरुणावर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील अल्पवयीन आदिवासी विद्यार्थिनीच्या आत्महत्या प्रकरणी अखेर राहुरी पोलिस ठाण्यात साहिल पठाण याच्यावर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला.

सातत्याने होत असलेल्या पाठलाग, छेडछाड, मानसिक छळ आणि धमक्यांना कंटाळून तिने आत्महत्या केल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकरणी साहील सिकंदर पठाण याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम पॉक्सो कायदा आणि अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. घटना घडून आठ दिवस उलटूनही पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने आदिवासी समाजात संतापाची लाट उसळली होती. पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत एकलव्य आदिवासी सेनेच्या वतीने अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांना निवेदन दिले होते.

आरोपीवर तत्काळ गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अन्यथा ६ ऑगस्ट रोजी राहुरी पोलीस ठाण्या समोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला होता. आदिवासी संघटनांच्या आक्रमक भूमिकेनंतर आणि वाढत्या जनक्षोभामुळे पोलीस यंत्रणा खडबडून जागी झाली. त्यानंतर राहुरी पोलिसांनी या विद्यार्थीनीच्या वडिलांना बोलावून घेत तक्रार नोंदवून आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. फिर्यादीनुसार आरोपी साहील सिकंदर पठाण हा या मुलीचा वारंवार पाठलाग करीत होता. शाळेच्या परिसरात, गावात तसेच ये-जा करताना तिचा छळ केला जात होता. यामुळे ती प्रचंड मानसिक तणावाखाली गेली होती.

या सततच्या जाचाला कंटाळून तिने आत्महत्ये सारखे टोकाचे पाऊल उचलल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला.

या प्रकरणी आरोपी विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८ आत्महत्येस प्रवृत्त करणे, ७८, ७९, ३५१(२) आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पॉक्सो कायदा कलम १२ अंतर्गतही कारवाई करण्यात आली. याशिवाय अनुसूचित जाती-जमाती अधिनियम १९८९ अंतर्गत कलम ३(१), ३(१), ३(१), ३ (२) आणि ३ नुसारही गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास श्रीरामपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# कर्तव्यात हलगर्जीपणा; घोगरगावचे पोलीस पाटील सुदाम बोरुडे निलंबित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील पोलीस पाटील सुदाम बोरुडे यांना कर्तव्यात कथित हलगर्जीपणा आणि शासकीय जबाबदाऱ्यांतील त्रुटींप्रकरणी निलंबित करण्यात आले आहे. श्रीगोंदा-पारनेर उपविभागाचे प्रांताधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांनी पोलीस विभागाच्या अहवालाच्या आधारे हा आदेश पारित केला असून, या कारवाईमुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस पाटील म्हणून गावातील कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे, अपघात, भांडणे व इतर महत्त्वाच्या घटनांची माहिती तात्काळ पोलीस प्रशासनाला देणे, ग्रामसुरक्षा दलाचे कामकाज प्रभावीपणे राबविणे तसेच विविध शासकीय उपक्रमांना सहकार्य करणे या जबाबदाऱ्या संबंधितांकडे होत्या. मात्र या कर्तव्यांच्या पालनात गंभीर त्रुटी आढळल्याचे चौकशीत निष्पन्न झाले.

चौकशीदरम्यान अनेक घटनांची माहिती पोलीस प्रशासनाला वेळेत न देणे, तपासात अपेक्षित सहकार्य न करणे, ग्रामसुरक्षा दलाच्या कामकाजात निष्क्रियता आणि शासकीय जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष केल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले. तसेच सुदाम बोरुडे यांनी सादर केलेल्या खुलाशामध्येही अनेक विसंगती आढळून आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. खुलाशातील दाव्यांना पुष्टी देणारे कोणतेही ठोस पुरावे सादर करण्यात आले नसल्याने पोलीस निरीक्षकांचा अहवाल, उपलब्ध नोंदी आणि संबंधित कागदपत्रांचा विचार करून प्रशासनाने निलंबनाचा निर्णय घेतला. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७ मधील तरतुदीनुसार पोलीस पाटील पदावरील व्यक्तीने निष्पक्ष, जबाबदार व कर्तव्यदक्ष राहणे अपेक्षित असते. मात्र संबंधित प्रकरणात या जबाबदाऱ्यांचे समाधानकारक पालन झाले नसल्याचा निष्कर्ष नोंदवत उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकाऱ्यांनी निलंबनाचे आदेश पारित केले.

या कारवाईनंतर घोगरगावसह श्रीगोंदा तालुक्यात विविध चर्चांना उधाण आले असून, शासकीय कर्तव्यातील हलगर्जीपणा प्रशासनाकडून सहन केला जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या निर्णयातून देण्यात आल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

# युरियासाठी शिबलापुरात बळीराजाची वणवण

## १०० गोण्यांसाठी हजारो शेतकऱ्यांची गर्दी । प्रशासनाचे दावे फोल !

**सोमनाथ डोळे । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील शिबलापूर आणि परिसरात सध्या युरिया खताचा मोठा तुटवडा निर्माण झाला असून, खत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत आहे. एका कृषी सेवा केंद्रात केवळ १०० गोणी युरिया उपलब्ध असताना खत खरेदीसाठी हजारोंच्या संख्येने शेतकरी जमा झाल्याने परिसरात तणावाचे आणि गोंधळाचे वातावरण पाहायला मिळाले.

शिबलापूर येथील एका कृषी सेवा केंद्रात युरियाचा स्टॉक आल्याची माहिती मिळताच परिसरातील शेतकऱ्यांनी मोठी गर्दी केली. मात्र, उपलब्ध साठा केवळ १०० गोणींचा होता आणि मागणी करणारे शेतकरी हजारांच्या घरात होते. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये आणि सर्वांना थोडे तरी खत मिळावे, यासाठी कृषी सेवा केंद्र चालकाने प्रत्येक शेतकऱ्याला केवळ 'एक गोण' देण्याचा निर्णय घेतला. अवघ्या एक गोणीसाठी शेतकऱ्यांनी सकाळपासून रांगा लावल्या होत्या, तरीही अनेकांना रिकाम्या हाताने घरी परतावे लागले. खत वाटप करताना केंद्र चालकाची मोठी दमछाक झाली.




मर्यादित साठा आणि प्रचंड मागणी यामुळे शेतकऱ्यांमध्ये बाचाबाची होण्याचे प्रकारही घडले. खत कमी आणि शेतकरी जास्त अशी स्थिती असल्याने वाटप कसे करावे, असा पेच दुकानदारासमोर उभा ठाकला होता. विशेष म्हणजे, जिल्हा कृषी अधीक्षक आणि प्रशासनाकडून जिल्ह्यात युरियाचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे वारंवार सांगितले जात आहे. मात्र, शिबलापूरमधील या परिस्थितीने प्रशासनाचे दावे फोल ठरवले आहेत. जर खत मुबलक आहे, तर आम्हाला एक-एक गोणीसाठी वणवण का करावी लागत आहे? असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत.

सध्या पिकांना युरियाची अत्यंत गरज आहे. वेळेवर खत न मिळाल्यास पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादनात घट येण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. कृषी विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शिबलापूर परिसरात युरियाचा पुरेसा पुरवठा करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# कर्जत-राशीन मार्गावर थार व इनोव्हाची समोरासमोर धडक : तिघे गंभीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : कर्जत-राशीन मार्गावर बेनवडी शिवारात थार आणि इनोव्हा कार यांच्या झालेल्या अपघातात तीन जण जखमी झाले. यापैकी एक जण गंभीर अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत आहे. समोरा-समोर झालेल्या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नाही. मात्र यात वाहनाचे मोठे नुकसान झाले. मंगळवार, दि ४ रोजी दुपारच्या सुमारास कर्जत-राशीन मार्गावर बेनवडी शिवारात थार (एमएच १२. झेड एल ३६३६) आणि इनोव्हा कार (एमएच १२. केजे ३१५१) या दोन वाहनांचा भीषण अपघात झाला. सुदैवाने गाडीच्या एअर बॅग्ज उघडल्याने मोठी जीवितहानी टळली. असली तरी सदरच्या अपघातात वाहनांचे मात्र मोठे नुकसान झाले. या अपघातामध्ये एकूण तीन जण जखमी झाले असून यातील एकाची परिस्थिती गंभीर आहे. स्थानिकांनी तात्काळ मदतकार्य सुरू करीत जखमीना १०८ रुग्णवाहिकेच्या मदतीने उपचारासाठी कर्जतच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. याबाबत राशीन पोलीस दुरक्षेत्रात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.





## पिंपळे व आढळा परिसरात घरफोडी ९७ हजारांचा ऐवज लंपास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील पिंपळे व आढळा शिवारात घरफोडीच्या दोन स्वतंत्र घटनांमध्ये अज्ञात चोरट्यांनी एकूण ९७ हजार रुपयांचा ऐवज लांबवला आहेत. आढळा पुलाजवळील गावठाण परिसरातून चोरट्यांनी ३५ हजार रुपयांचे चार मोठे व तीन लहान जनावरे चोरून नेली. याप्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या घटनेत, पिंपळे येथे अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत ६२ हजार रुपयांची रोकड आणि एक बोकड लांबवला. या प्रकरणी संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, दोन्ही घटनांमधील अज्ञात आरोपींचा शोध पोलीस घेत आहेत.

## मालवाहतुक ट्रकच्या धडकेत एक गंभीर जखमी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मालवाहू ट्रकच्या धडकेत मोटारसायकलस्वार गंभीर जखमी झाला. नगर-मनमाड राज्य महामार्गावरील राहुरी हद्दीत जागोजागी पडलेले खड्डे अपघाताच्या या घटनेस कारणीभूत ठरले आहेत. नगर - मनमाड राज्य महामार्गावरील राहुरी कृषी विद्यापीठा जवळील उजव्या कालव्याजवळ मंगळवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास अपघाताची ही घटना घडली. सोमनाथ राऊत (रा. मुलनमाथा, राहुरी) हा तरुण मोटरसायकलवर नगर दिशेला जात होता. यावेळी नगरकडू न राहुरी दिशेला जात असलेल्या मालवाहू ट्रकची धडक बसल्याने राऊत हा गंभीर जखमी झाला. या रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांनी घटनास्थळी रुग्णवाहिकेस पाचारण करून सोमनाथ यास उपचारार्थ नगरच्या सरकारी दवाखान्यात दाखल करण्यास मदतकार्य केले. महामार्गावरील राहुरी तालुका हद्दीतील खराब रस्ते या अपघाताच्या घटनेस कारणीभूत ठरले आहेत. जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे या मार्गावर वाहने चालविणे तारेवरची कसरत ठरत आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी या रस्त्याचे मजबुतीकरण जास्तीत -जास्त काम मार्गी लावले जाईल, हे आश्वासन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, मुख्य ठेकेदार व भारत कन्ट्रक्शनचे प्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी यांच्या बैठकीत दिली होती. मात्र, दोन महिन्याचा कालावधी उलटून देखील रस्ता मजबुतीकरण काम धिम्या गतीने सुरू असल्याने नगर -मनमाड राज्य महामार्गावरील राहुरी हद्दीत लहान मोठ्या अपघाताची मालिका सुरू आहेत.

## जमिनीच्या वादातून अंगावर सोडला कुत्रा; एक गंभीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील कारेगाव-भेर्डापूर रोड परिसरात जमिनीच्या बांधावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीच्या अंगावर पाळीव कुत्रा सोडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात एक जण गंभीर जखमी झाला आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोहित दिलीप पवार हे आपल्या शेतात सोयाबीन पिकातील गवत काढत असताना, शेजारील भाऊसाहेब लक्ष्मण लवांडे यांनी सामायिक शेतीच्या बांधाच्या जुन्या कारणावरून मनात राग धरला. वाद घालत त्यांनी आपल्या पाळीव कुत्र्याला 'छू' म्हणून पवार यांच्या अंगावर सोडले. या हल्ल्यात कुत्र्याने त्यांच्या उजव्या पायाच्या पोटरीला जोराचा चावा घेतल्याने ते गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी मोहित पवार यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर तालुका पोलिसांनी आरोपी भाऊसाहेब लक्ष्मण लवांडे (रा.भेर्डापूर ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

## श्रीरामपूरात रेल्वे रुळाजवळ अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील बेलापूर-पढेगाव रेल्वे रुळाजवळ एका अंदाजे ५० ते ५५ वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला. याप्रकरणी रेल्वे कर्मचारी अर्जुन भीमसेन यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली.घटनास्थळी पोहोचलेल्या रेल्वे पोलिसांनी मृत व्यक्तीचा पंचनामा केला असून, गंभीर दुखापत व अतिरक्तस्रावामुळे मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहेत. पुढील तपास पोलीस हवालदार किरण शिंदे करत आहेत.

## श्रीरामपूरमध्ये 'जातीय तेढ निर्माण करणारा' व्हिडीओ वायरल, सराईत गुन्हेगार अटकेत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : इन्स्टाग्रामवर सार्वजनिक शांतता भंग होईल व धार्मिक तेढ निर्माण होईल असा आक्षेपार्ह व्हिडीओ बनवून अपलोड करणाऱ्या अज्जु उर्फ अजिम अन्वर पठाण (रा. वॉर्ड क्र. २, श्रीरामपूर) या सराईत गुन्हेगाराला श्रीरामपूर शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीच्या मोबाईलची पाहणी केली असता, त्यावर वादग्रस्त व्हिडीओ आढळले. त्याच्यावर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. नागरिकांनी सोशल मीडियावर अफवा पसरवू नये आणि आक्षेपार्ह मजकूर फॉरवर्ड करू नये, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. आरोपीवर अन्य सात गुन्हे दाखल आहेत.

## झरेकाठीत बिबट्याचा पुन्हा धुमाकूळ; शेळी ठार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील झरेकाठी परिसरात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी सायंकाळी सुमारे ५.२० वाजण्याच्या सुमारास गट क्रमांक ११८ मधील बाजीराव कुंडलिक वाणी यांनी शेळ्या डाळिंब बागेत चारण्यासाठी सोडल्या असता अचानक बिबट्याने एका शेळीवर झडप घातली. यावेळी त्यांचा मुलगा अमोल वाणी यांनी आरडाओरड केल्याने बिबट्याने ठार केलेली शेळी तिथेच सोडून जंगलाच्या दिशेने पळ काढला. विशेष म्हणजे, याच परिसरात दहा दिवसांपूर्वी बिबट्याने संदीप वाणी यांच्यावर हल्ला केला होता. त्यानंतर त्यांच्या शेळ्यांच्या गोठ्यावरही हल्ला करून एका शेळीला जखमी केले होते. वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ डोळे यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिली असून, बाधित शेतकऱ्याला तातडीने नुकसानभरपाई देण्यात यावी तसेच परिसरातील बिबट्याला जेरबंद करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी वनविभागाकडे केली आहे.